POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक   कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२६६ ● मुंबई, बुधवार, २९ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# उष्णतेमुळं जनजीवन विस्कळीत

## रस्ते निर्मनुष्य, 24 तासांत पाहायला मिळणार हवामानाचं नवं रुप

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

एप्रिल महिन्यातील उकाड्यानं नागरिकांना हैराण केलेलं असातनाच मे महिन्यात ही परिस्थिती आणखी किती भीषण होईल याच चिंतेनं अनेकांना घाम फुटत आहे. अतिशय भीषण तापमान वाढीमुळं महाराष्ट्रात भट्टीसारखी उष्णता वाढू लागली असून विदर्भात पारा पन्नाशीच्या दिशेनं जाताना पाहून यंत्रणांनाही धडकी भरली आहे. देशभरात अशीच काहीशी स्थिती असताना आयएमडीनं एक वेगळा अंदाज जारी केला आहे. पुढील 24 तासांसाठीचा हा अंदाज असून देशभरात दुहेरी हवामान पाहता येईल असं सांगण्यात आलं आहे.




कटऊ च्या हवामान पूवार्नुमानानुसार उत्तर मध्य आणि पश्चिम भारतामध्ये अतिउष्ण वातावरणाचा मारा सहन करावा लागेल. तर, पूर्वोत्तर भारत आणि काही उत्तर पश्चिमी भागांमध्ये पाऊस, वादळीवारे अशी स्थिती पाहता येईल. महाराष्ट्रातील विदर्भात उष्णतेचा मारा कायम असेल, तर, गुजरातसह राजस्थानातही हेच चित्र असेल.

**पुढच्या 24 तासांमध्ये कसं असेल हवामान?**

अमरावती, यवतमाळ आणि विदभार्च्या बहुतांश भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचा परिणाम जनजीवनावर झालेला असतानाच अकोल्यात सर्वाधिक तापमानाची नोंद करणअयात आली. जिथं पारा 46.9 अंशांवर पोहोचला होता. याचदरम्यान विदभार्ला आता पावसाचा इशारा देण्यात आला असून, नागरिकांनाही सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

**विदभार्तील कोणत्या जिल्ह्यांत आज पावसाचा अंदाज?**

नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये बुधवारपर्यंत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाच्या हलक्या सरींचा अंदाज आहे. पश्चिमेकडील वारे पुन्हा सक्रिय होत असल्यामुळं तापमानात किंचित घट होऊन ही स्थिती निर्माण होईल. यादरम्यान, मराठवाड्यात तापमान 40 अंश सेल्सिअसहून जास्त असेल, तर विदर्भात पारा घसरू शकतो. मात्र यातून दिलासा मिळण्याची शक्यता धुसर.

**उर्वरित राज्यात काय स्थिती?**

फक्त विदर्भच नव्हे, तर मराठवाड्यातही उष्णतेची लाट सक्रिय होईल, तर मुंबईसह कोकण किनारपट्टीवर तापमान सरासरीपेक्षा कमी राहील. मात्र हवामान दमट असल्या कारणानं इथं उष्मा अधिक अडचणी निर्माण करताना दिसेल. यादरम्यान मध्य महाराष्ट्रात तापमान 38 ते 40 अंशांदरम्यान असेल असा अंदाज आहे.

हवामानाच्या सर्वसमावेशक अंदाजानुसार देशाच्य उत्तर आणि मध्य क्षेत्रांमध्ये उष्णतेचा कहर अधिक असेल. तर, पूर्वोत्तर भारतामध्ये पावसाचा इशारा आहे. जम्मू काश्मीर, हिमाचल आणि उत्तराखंडसारख्या भागांमध्ये हिमवषार्वाचा अंदाज आहे.



**कोणत्या जिल्ह्यात किती हाय रिस्क गावे?**

यवतमाळ 539, अमरावती 504, नाशिक 488, रायगड 488, नागपूर 482, पुणे 479, चंद्रपूर 467, सातारा 442, गडचिरोली 433, नांदेड 404, अहिल्यानगर 401, रत्नागिरी 388, जळगाव 383, बुलढाणा 364, वर्धा 353, बीड 344, छत्रपती संभाजीनगर 339, कोल्हापूर 310, सोलापूर 291, अकोला 249, जालना 242, गोंदिया 239, लातूर 238, नंदुरबार 238, पालघर 231, भंडारा 226, परभणी 212, ठाणे 212, वाशिम 198, सिंधुदुर्ग 189, धाराशिव 185, सांगली 184, हिंगोली 178, धुळे 171

# महाराष्ट्रातील 11 हजार 91 गावांमध्ये हाय अलर्ट जाहीर!

## तुमच्या जिल्ह्यातील किती गावांचा समावेश, पाहिलं का?

■ **मुंबई प्रतिनिधी,**

महाराष्ट्रामध्ये एकीकडे उन्हामुळे वाढलेल्या तापमानाची चर्चा असतानाच राज्यातील आरोग्य व्यवस्थेला धक्का देणारी आकडेवारी समोर आली आहे. ही आकडेवारी एका आजारासंदर्भात असून राज्यातील 11 हजार गावांना याच पार्श्वभूमीवर हाय अलर्ट देण्यात आला आहे. मागील महिन्याभरामध्ये महाराष्ट्रात या आजाराचे तब्बल 6 हजार नवे रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली आहे.

**केंद्र सरकारच्या मोहिमेत समोर आली धक्कादायक माहिती**

केंद्र सरकारने देशाला क्षयरोगमुक्त (टीबीमुक्त) करण्यासाठी 100 दिवसांची विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेतून धक्कादायक वास्तव समोर आले आहे. 24 मार्च 2026 पासून सुरू झालेल्या या मोहिमेच्या पहिल्या 35 दिवसांतच राज्यात 6 हजार 111 नवे क्षयरोगी आढळले आहेत. देशातील दीड लाख, तर एकट्या महाराष्ट्रातील 11 हजार 91 गावांना क्षयरोगाचा धोका आहे. क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सध्या 'एआय' आधारित व्हीएमटीबी टूलचा वापर केला जात आहे. या तंत्रज्ञानाद्वारे राज्यातील 11 हजार 91 गावे 'हाय रिस्क' म्हणून निवडली आहेत.

**'हाय रिस्क' गावे कोणत्या आधारावर ठरवण्यात आली?**

- भौगोलिक स्थिती : झाडे, प्रदूषण आणि जलाशयांची स्थितीही लक्षात घेण्यात आली.
- आरोग्य स्थिती : कुपोषण, लसीकरणाची व्याप्ती, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोग रुग्णांची संख्या हे निकष लावण्यात आले.
- जीवनशैली : दारू आणि तंबाखूचे सेवन करणारे लोक, दाट लोकवस्ती आणि कामाच्या ठिकाणाचा डेटा गोळा करण्यात आला.

**या आजाराची 4 प्रमुख लक्षणं कोणती?**

- सततचा खोकला– 2 आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकणारा खोकला हे टीबीचे मुख्य लक्षण आहे. कधीकधी खोकल्यातून रक्त येणे किंवा थुंकी येण्यासारखे प्रकारही घडतात.
- रात्रीचा घाम– झोपेत भरपूर घाम येणे, कपडे भिजणे हे सुद्धा टीबीचे लक्षण आहे.
- वजन कमी होणे– कारण नसताना अचानक वजन कमी होणेसुद्धा टीबीच्या प्रमुख लक्षणांपैकी एक आहे.
- ताप– 2 आठवड्यांपेक्षा जास्त काळ येणारा तापसुद्धा टीबी असल्याचं लक्षण आहे. सामान्यतः असा ताप संध्याकाळी येतो.

# नालासोपाऱ्यात मराठी भाषेवरून मनसे आक्रमक

■ **विरार। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात मराठी भाषेबाबतचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नालासोर्पायात त्याचे ठळक पडसाद उमटताना दिसले आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मेपासून मराठी भाषा न येर्णाया वाहनचालकांच्या परवान्यांबाबत कडक भूमिका घेण्याचा इशारा दिल्यानंतर शहरात दोन भिन्न मतप्रवाह निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे)ने प्रत्यक्ष मैदानात उतरून आपली भूमिका अधिक ठाम केली आहे. सोमवारी सायंकाळी मनसेच्या कार्यकर्त्यांनी नालासोर्पायात विशेष मोहीम राबवत रिक्षांवर 'मी मराठी बोलतो, मला मराठी समजते, या माझ्या रिक्षात बसा' असे स्टिकर्स लावले आहेत .

नालासोपारा परिसर हा पारंपरिकरित्या हिंदीभाषिक लोकसंख्येसाठी ओळखला जात असला, तरी स्थानिक पातळीवर मराठीबाबत सकारात्मक




वातावरण तयार होत असल्याचे या मोहिमेतून दिसून आले. विशेष म्हणजे काही हिंदीभाषिक रिक्षाचालकांनीही स्वेच्छेने आपल्या वाहनांवर मराठी स्टिकर्स लावत या उपक्रमाला पाठिंबा दर्शवला. महाराष्ट्र आमची कर्मभूमी आहे. मराठी शिकणे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे, अशी भावना काही चालकांनी व्यक्त केली. दरम्यान, मनसेच्या कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या निर्णयाचे समर्थन करत मराठी ही राज्याची राजभाषा असून ती येणे आवश्यक असल्याचे ठामपणे सांगितले. तसेच, शहर बंद करण्याचा किंवा कायदा हातात घेण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला 'मनसे स्टाईल'ने उत्तर दिले जाईल, असा इशाराही देण्यात आला.

या घडामोडींमुळे नालासोपाऱ्यात भाषिक प्रश्नावर नव्या घडामोडींना सुरुवात झाल्याचे चित्र आहे. स्थानिकांचा वाढता पाठिंबा, रिक्षाचालकांची भूमिका आणि मनसेची आक्रमक भूमिका यामुळे ४ तारखेला पुकारण्यात आलेल्या बंदला किती प्रतिसाद मिळतो, तसेच प्रशासन आपली भूमिका कितपत प्रभावीपणे राबवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पंतप्रधानांच्या बनावट पत्राद्वारे खंडणी उकळणाऱ्या दोघांना अटक

# मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाची कारवाई

■ **मुंबई प्रतिनिधी,**

पंतप्रधानांच्या स्वाक्षरीचे बनावट पत्र दाखवून एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालिकेकडून ४ लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने अटक केली आहे. तौसीफ हुसेन इस्माईल पटेल आणि सिद्धीनाथ दीनानाथ पांडे उर्फ सुनील अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून ते गोरेगाव येथील रहिवासी आहेत. आरोपींना एस्प्लनेड न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार महिला २०२० पासून 'मेगा श्रेया' नावाची समाजसेवी संस्था चालवतात. २०२२ मध्ये एका कार्यक्रमादरम्यान त्यांची ओळख जाहिरात क्षेत्रात काम करणाऱ्या तौसीफ पटेल आणि फर्नाझ वाडिया यांच्याशी झाली होती. १८ मार्चला पटेलने या महिलेला व्हॉट्सॲपवर व्हॉइस नोट पाठवून पंतप्रधान कार्यालयाकडून वाढदिवसाचे शुभेच्छा पत्र मिळवून देतो, असे आमिष दाखवले. सुरुवातीला हा दावा फोल वाटल्याने तक्रारदाराने त्याकडे




दुर्लक्ष केले. मात्र, आरोपींनी हे पत्र खरे असल्याचे भासवून पीआर शुल्काच्या नावाखाली ४ लाख रुपयांची मागणी केली. २८ मार्चला फर्नाझ वाडियाने पंतप्रधान मोदी यांची स्वाक्षरी असलेले एक डिजिटल पत्र तक्रारदाराला पाठवले. या पत्रात त्यांच्या सामाजिक कायार्चे कौतुक करण्यात आले होते. संशय आल्याने तक्रारदाराने हे पत्र समाजमाध्यमावरून हटवले, तेव्हा आरोपींनी पैशांसाठी त्यांच्यावर दबाव वाढवला.

आरोपींनी तक्रारदाराच्या नावाने एक बनावट ई–मेल आयडी तयार करून हा पत्रव्यवहार खरा असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. २ एप्रिलला वरळी येथील एका कॅफेमध्ये झालेल्या भेटीत आरोपींनी पंतप्रधान कार्यालयात आमचे संबंध असल्याचे सांगून ४ लाख रुपये दिल्यास मूळ फ्रेम केलेले पत्र देण्याचे आश्वासन दिले. सततच्या धमक्यांमुळे तक्रारदाराने पोलिसांत धाव घेतली. खंडणीविरोधी पथकाने वरळी सी फेस येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून खंडणीची रक्कम स्वीकारताना दोन्ही आरोपींना रंगेहाथ पकडले.

**आरोपींकडून बनावट स्वाक्षरीचे पत्र जप्त**

पोलिसांनी आरोपींकडून पंतप्रधानांच्या बनावट स्वाक्षरीचे फ्रेम केलेले पत्र, खेळण्यातील नोटांचे बंडल, दोन खऱ्या ५०० रुपयांच्या नोटा आणि दोन मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. याप्रकरणी वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी तो खंडणीविरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अरुण थोरात या प्रकरणाचा अधिक तपास करत असून या गुन्ह्यात अन्य आरोपींचा सहभाग आहे का, तसेच अशा प्रकारे अन्य कोणाची फसवणूक झाली आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

## शुभमंगल 'सावधान'!

### मुंबईतील तरुणीला लाखोंना गंडवून नवरदेव पळाला, ४ वर्ष काढलं वेड्यात

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

कॉल सेंटरमध्ये काम करताना ४० वर्षीय महिलेची कमलेश दळवी या तरुणासोबत मैत्री झाली. हळूहळू जवळीक वाढली आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. चार वर्षांच्या प्रेमसंबंधांनंतर अखेर दोघांचा मोठ्या थाटामाटात विवाह झाला. मात्र हा पती लग्नानंतर कधी पसार झाला, हे महिलेला कळलेच नाही. कमलेश केवळ आयुष्यातून निघून गेला नव्हता तर, त्याने जवळपास २८ लाखांचा गंडा तिला घातला होता. मुलुंड पूर्वेकडे राहणारी वासंती (बदललेले नाव) ही विक्रोळी येथील कॉल सेंटरमध्ये काम करत असताना तिची ओळख कमलेश दळवी याच्यासोबत झाली. मैत्री झाल्यानंतर कमलेशने त्याच्या पत्नीचे निधन झाल्याचे सांगत सहानुभूती मिळवत वासंतीशी जवळीक साधली. वासंती ही त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत असल्याने पाहून त्याने तिच्यावर प्रेम करीत असल्याचे सांगितले. तीन–चार वर्षांपासूनची मैत्री असल्याने वासंती हिने होकार दिला. प्रेमप्रकरणाबाबत घरीही सांगितले. त्यानंतर दोघांनी लग्न करण्याचे ठरविले. वासंती हिनेही त्याला वेळोवेळी पैसे दिले. सन २०२० ते २०२४ या कालावधीत तिने कमलेश याला २० लाख रुपये दिले. इतकी रक्कम दिल्यानंतर वासंती हिने लग्नासाठी तगादा लावला. याचदरम्यान भावाचा अपघात झाला असून त्याला रुग्णालयात दाखल केल्याचे कमलेशने सांगताच वासंतीने दागिने गहाण ठेवून जवळपास आठ लाख रुपये दिले. मुलुंड येथे थाटात त्यांचे लग्न झाले. मात्र लग्नात कमलेशकडून कुणीच नातेवाईक नव्हते, त्यामुळे संशय होताच! त्यातच लग्नानंतरही राहण्यासाठी भाड्याने घर घेण्यास तो पैसे मागू लागला. त्यावेळी कमलेशकडे राहण्यास घरही नसल्याचे समजले. पितळ उघडे पडत असल्याचे पाहून कमलेश पसार झाला आणि वासंतीने नवघर पोलिस ठाण्यात तक्रार केली.

## 15 तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढत केले लैंगिक अत्याचार

# अश्लील व्हिडिओ बनवत वेगवेळ्या लॉजवर... कोल्हापूर हादरलं

■ **कोल्हापूर। प्रतिनिधी,**

हिंदू समाजातील 15 मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे अश्लील व्हिडिओ बनवून त्यांना बदनामीची धमकी देत शाहिद सनदीने क्रूरतेची परिसिमा ओलांडली. या घटनेत बळी पडलेल्या तरुणींपैकी एक तरुणी पुढं आली आणि नंतर हे प्रकरण लव्ह जिहादचे असल्याची माहिती समोर आली असा आरोप आहे. अत्याचार करणाऱ्या शाहिद सनदीला सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण करत राजारामपुरी पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी हातकणंगले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. शाहीदला अटक केली, त्याला 4 दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**कोल्हापूरमध्ये मोठं सेक्स स्कँडल**

अशातच शाहिद सनदी आणि शाहरूख देसाईच्या तपासासाठी एसआयटीचे पथक स्थापन करा, अशी गावकऱ्यांनी मागणी केली. तसेच शिरोली बंद ठेवत सनदीचा पाणी–वीज पुरवठा खंडीत करून कुटुंबियांना गावातून हकलवण्याचा इशारा देण्यात आला होता. शाहीद सनदीनं गावातील हिंदू मुलींचे शोषण केल्याचं उघडकीस आलं, असा आरोप करण्यात येत आहे, या घटनेनं संपूर्ण शिरोली ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली.



**शाहीद सनदीची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी**

या प्रकरणाच्या निषेधार्थ गाव बंद ठेवण्यात आलं. तसेच गावाच्या कमानीजवळ समस्त हिंदू बांधवांनी धाव घेतली. याच प्रकरणी निदर्शने करत जमाव आक्रमक झाला. यामुळे पोलिसांचा प्रचंड फौजफाटा तैनात झाला. शाहीद सनदीची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात आली. सनदीची मदत करणाऱ्या शाहरूख देसाईला तात्काळ अटक करा, अशा नराधमांना पाठिंबा देणाऱ्यांचा पदार्फाश करा अशा मागण्या ग्रामस्थांनी केल्या.

**पीडितांना वेगवेगळ्या लॉजवर नेत अत्याचार केल्याचा आरोप**

शाहीद सनदीने मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांना अनेक आमिष दाखवले. कोल्हापूर आणि शिरोलीत वेगवेगळ्या लॉजवर नेते अत्याचार केला. अनेक दिवसांपासून त्याचे हे कृत्य सुरुच होते. त्याने पीडित तरुणींसोबतचे अश्लील व्हिडिओ तयार केले होते, नंतर त्याच व्हिडिओचा वापर करत ब्लॅकमेल केले. अनेक मुली बदनामीला घाबरू लागल्या आणि त्याच्या सांगण्यावरून वागू लागल्या होत्या.

एका पीडितेनं सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांकडे धाव घेतली, नंतर तरुणांनी शाहीद सनदीला बेदम चोप देण्यात आला. पीडितेची तक्रार घेवून हा गुन्हा राजारामपूरी पोलिसांनी तात्काळ हातकणंगले पोलिसांकडं वर्ग केला. दरम्यान, पीडितेच्या धाडसामुळे हे प्रकरण उघडकीस आले. परिस्थिती पाहता शाहीद सनदीने पीडित तरुणींचे व्हिडिओ डिलिट केले.

पोलिसांनी सायबर कक्ष आणि लॅबोरेटीकडे पुरावा असणारा मोबाईल सुपूर्द केला असून, त्या माध्यमातून संपूर्ण व्हिडिओ आणि विविध मुलीचं असणारं चॅटिंग प्राप्त करण्याचं काम सुरु झालं. त्यानं असं कृत्य करत अशा आणखी किती तरुणींवर लैंगिक अत्याचार केलेत, याची पुढील चौकशी सुरु आहे. या अत्याचार प्रकरणात शाहीद सनदीला त्याचा सहकारी शाहरूख देसाईने मदत केल्याची माहिती समोर आली. त्याचं नाव समोर येताच त्याने घटनास्थळावरून पळ काढला.

# जव्हारच्या शिरोशीत बेकायदेशीर खत विक्री उघड

■ **जव्हार। प्रतिनिधी,**

जव्हार तालुक्यातील शिरोशी परिसरात बेकायदेशीर खत विक्रीचा प्रकार उघडकीस रविवारी सायंकाळी ७ वाजता उघडकीस आला असून यामुळे शेतकरी व स्थानिक परवानाधारक विक्रेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार एका वाहनातून विविध प्रकारचे खत व कृषी पूरक साहित्य बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी आणण्यात आले होते. याबाबतची माहिती मिळताच जव्हार तालुका कृषी अधिकारी जयराम अढळ व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत तपासणी केली. या कारवाईत संबंधितांकडे आवश्यक परवाने व कागदपत्रे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले.

तपासणीदरम्यान झिंक सल्फेट, डीएपी, सेंद्रिय खत, प्लांट ग्रोथ प्रमोटर तसेच डायटोमाइट सिलिकॉन पावडर यांसारख्या विविध कृषी उत्पादनांचा साठा आढळून आला. एकूण शेकडो किलोचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती अधिर्कायांनी दिली. या प्रकरणी संबंधित व्यक्तींविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे. बेकायदेशीर विक्रीमुळे शेतर्कयांची फसवणूक होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

दरम्यान, गावातील एका सुशिक्षित तरुणाने उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांच्याकडे दिलेल्या तक्रारीनुसार, 'ओम साई फर्टिलायझर',



भरुच (गुजरात) ही संस्था कोणतीही वैध परवानगी नसताना गावोगावी फिरून थेट शेतर्कयांना खत विक्री करत असल्याची बाब समोर आली आहे. हा प्रकार 'फर्टिलायझर कंट्रोल ऑर्डर, १९८५' या कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अनधिकृत विक्रीमुळे स्थानिक परवानाधारक विक्रेत्यांचे आर्थिक नुकसान होत असून शेतर्कयांना निकृष्ट अथवा अयोग्य दर्जाच्या खताचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी पिकांच्या उत्पादनावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


**शेतकऱ्यांसाठी आवाहन**

अनधिकृत विक्रेत्यांकडून खत खरेदी करताना सावधगिरी बाळगावी, विक्रेत्याचा परवाना तपासावा आणि अधिकृत बिल घेणे अनिवार्य असल्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. दरम्यान, या प्रकरणात प्रशासन पुढे कोणती कारवाई करते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ही गुरु-शिष्य परंपरा नाकारणे म्हणजे हिंदुत्व नाकारणे!



महाराष्ट्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यक्रमात आलेले बागेश्वरधामचे पंडित धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांनी समर्थ रामदासस्वामी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील गुरु-शिष्याचे सुंदर नाते लक्षात आणून देण्यासाठी एक कथा काय सांगितली! झाले! बिळात लपून बसलेले समर्थद्वेषी, हिंदु धर्मद्वेषी फुत्कार सोडत बाहेर आले आणि नेहमीप्रमाणे 'यांना खपवून घेणार नाही, यांची हिंमत कशी होते? ते मूर्ख, बिनडोक आहेत' इत्यादी बाष्कळ बडबड करू लागले. जणू काही पंडित धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांनी पुष्कळ मोठे चुकीचे आणि अजब विधान केले. पंडित धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांनी तर भारताची दैवी गुरु-शिष्य परंपरेची योग्यता, क्षमता या कथेतून दाखवून देत या परंपरेचाच एक प्रकारे गौरव केला आहे; पण हे समजणार कुणाला? जे हिंदु धर्मातील प्रथा, चालीरिती, गुरु-शिष्य परंपरा यांना मानतच नाहीत, त्यांनी टीका करावी? असो, या निमित्ताने महाराष्ट्रावर थोपवलेल्या जुन्या वादाविषयी भाष्य करण्याची ही संधी विरोधकांनी दिली आहे. भारतवर्षात जे राजे, महाराजे, दैवी पुरुष, कर्तृत्ववान व्यक्ती झाल्या, त्यांनी कुणाच्या ना कुणाच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे भारताचा इतिहास पालटणारे महान राजे! त्यांना त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीच ईश्वरी अधिष्ठान, दैवी बळ यांची आवश्यकता भासल्याने त्यांनी समर्थ रामदासस्वामी यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. युद्धकलेचे ज्ञान दादोजी कोंडदेव यांच्याकडून घेतले, त्याचप्रमाणे अध्यात्म-धर्म यांचे ज्ञान जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्याकडून घेतले. याविषयी समकालीन संदर्भही आढळतात; मात्र समर्थ रामदासस्वामी आणि दादोजी कोंडदेव ठरले ब्राह्मण समाजातील! झाले! येथेच ब्रिगेडी विचारसरणीला 'शॉक' बसतो. हा मुख्य म्हणजे वाद नसून त्याला सामाजिक आणि जातीय किनार आहे. 'विसाव्या शतकाच्या प्रारंभीपासून काही इतिहासकारांनी समर्थांना महाराजांचे गुरु ठरवून स्वराज्याचे श्रेय एका विशिष्ट वर्गाकडे नेण्याचा प्रयत्न केला', असा आरोप बहुजन संघटनांकडून केला जातो. महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष आणि संघटना स्वतःची विचारसरणी प्रस्थापित करण्यासाठी या वादाचा वेळोवेळी वापर करतात. अलीकडच्या काळात काही नेत्यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे हा वाद पुन्हा चर्चेत आला आहे. म्हणजे यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदासस्वामी यांपेक्षा ब्राह्मणवर्गाला अन् त्या आडून हिंदु धर्माला लक्ष्य करण्याचा प्रयत्न वारंवार केला जातो. महाराष्ट्रात आणि देशात गत काही दशकांपासून 'उच्च जातीने खालच्या जातीवर अन्याय केला; म्हणून खालच्या जातींचा विकास झाला नाही, ते उपेक्षित राहिले', असे सतत सांगून खालच्या जातींना संरक्षण, सवलती, आरक्षण वगैरे देण्यात आले. त्यामुळे खालच्या जातींतील लोक मूळ प्रवाहात आले, त्यांना चांगले सामाजिक-राजकीय स्थान प्राप्त झाले. आता त्यांच्या स्थानाला धक्का लागू नये आणि उच्च जातीचे महत्त्वच राहू नये, अशी व्यवस्था असणाऱ्या हिंदु धर्माचेही विशेष नाव होऊ नये, असे ब्रिगेडी विचारसरणीला वाटते. त्यामुळे उच्च जातींपैकी ब्राह्मण वर्गातील जो कुणी असेल, मग तो क्रांतीकारक, समाजसुधारक, संत, शासक, प्रशासक इत्यादी असला आणि भारतासाठी कितीही चांगले काम केलेले असले, तरी त्याच्यावर खोटेनाटे आरोप करून, त्याला अपमानीत करून, त्याला मुलांच्या पाठ्यपुस्तकापासून ते त्यांचे विचार मांडण्याला कोणतेही व्यासपीठ मिळू नये, यासाठी धडपडायचे, अशी खेळी ब्रिगेडी विचारसरणीने काही दशके महाराष्ट्रात केली आहे. या खेळीमुळेच उलट जातीयवाद वाढला आहे आणि इतिहास भरकटवला जात आहे. इतिहासातील तथ्यांपेक्षा स्वतःच्या सोयीनुसार इतिहासलेखन काही ब्रिगेडी विचारसरणीने केले आहे. या ब्रिगेडींनी म्हणे हिंदु धर्माला पर्याय म्हणून 'शिवधर्म' नावाने नवीन धर्म निर्माण करण्याचाही हास्यास्पद आणि केविलवाणा प्रयत्न केला; मात्र हिंदु धर्मातील तेजस्वीता, चैतन्य आणि मुख्य म्हणजे हिंदूंनीच या प्रयत्नांवर लत्ताप्रहार करत ब्रिगेडींचे षड्यंत्रच नेस्तनाबूत केले. आज ब्राह्मणद्वेषाआडून हिंदु धर्मावर आघात करू पहाणारे कुठे आहेत? त्यांना तोंड दाखवायलाही जागा नाही. कुणावर शाईफेक होत आहे, कुणावर फसवणुकीचे आरोप होत आहेत, कुणी मार खात आहेत, कुणाची बोबडीच वळली आहे; म्हणजे ज्यांनी महाराष्ट्रात जातीय द्वेषाचे राजकारण केले, त्यांचेच हात-पाय पोळून निघत आहेत; मात्र त्यांनी हिंदु मनामनांत भिनवलेल्या विषाचे काय? सातारा येथे 'शिवसमर्थ शिल्पा'चे अनावरण करण्यास याच द्वेषमूलक राजकारणामुळे कडाडून विरोध करण्यात आला. येथे आणखी एक महत्त्वाचे सूत्र आहे. ते म्हणजे समर्थ रामदासस्वामी यांच्याशी छत्रपती शिवाजी महाराजांचा संदर्भ जोडल्यामुळे महाराजांचे महत्त्व, कर्तृत्व न्यून होते, असे सांगर्णाया संघटना राजकारण्यांकडून छत्रपतींचा अवमान झाला, दूरचित्रवाणीवरील मालिकांमधून टीका झाली, छत्रपतींची मानहानी होईल असे स्टेटस धर्मांधांकडून ठेवण्याच्या घटना घडल्या की, ब्रिगेडी त्याला विरोध का करत नाहीत? शांत का रहातात? म्हणजे छत्रपती शिवरायांच्या अवमानाचा आव आणत छत्रपतींना दिशानिर्देशन करर्णायांचे कर्तृत्व नाकारायचे आणि छत्रपतींचा प्रत्यक्ष अवमान करर्णायांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायचे, ही खेळी ब्रिगेडी खेळत आहेत. या खेळीत ब्रिगेडींना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे साहाय्य लाभते. 'महाराष्ट्रात जातीय राजकारणाला शरद पवार यांनी वेगळा पक्ष स्थापन केल्यापासून प्रारंभ झाला', असे मागे एका भाषणात 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'चे संस्थापक आणि अध्यक्ष राज ठाकरे यांनी सांगितले होते. त्या कालावधीतच अनेक ब्रिगेडी संघटना निर्माण झाल्या आणि त्यांचा वापर सामाजिक अन् राजकीय हेतू साध्य करण्यासाठी केला गेला. त्या संघटना आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे, आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर असे एकाहून एक राष्ट्रपुरुष महाराष्ट्राने दिलेले असतांना केवळ 'शाहू-फुले-आंबेडकर' एवढीच महाराष्ट्राची परंपरा सीमित का ठेवली गेली? यातून जातीद्वेषामुळे महाराष्ट्रातील अन्य राष्ट्रपुरुषांचे महत्त्वच नाकारले आहे, त्याचे काय? यातून समर्थ रामदासस्वामी आणि छत्रपती शिवाजी महाराज हे तर एक निमित्त आहे, खरे लक्ष्य तर वेदपरंपरा असलेला हिंदु धर्म आहे, हिंदु धर्मातील लाखो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरा आहेत, हे येथे सूज्ञांनी लक्षात घ्यावे!

# भोंदूबाबा आणि व्यवस्थेच्या बळी

श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या गुंत्यात होणारे महिलांचे शोषण आणि त्याविरुद्धचा लढा हा केवळ कायदेशीर नसून तो प्रस्थापित मानसिकतेविरुद्धचा एक अत्यंत विषम संघर्ष आहे. एका बाजूला भोंदू बुवांचे प्रस्थ आणि दुसरीकडे पिंजऱ्यात उभी केलेली पीडिता, अशा विदारक वास्तवावर भाष्य करणारा हा विशेष लेख.



कोणतीही लढाई खडतरच असते. बुवा आणि भक्त यांच्यात आढळणाऱ्या विशिष्ट नात्यामुळे बुवाने केलेल्या शोषणाविरुद्धची पीडित महिलेची लढाई अधिक खडतर असते. बहुतेकवेळा केवळ महिला नाही तर तिचे कुटुंबीय देखील एखाद्या भोंदूला गुरू मानून त्याच्या दरबारी जात असतात. कुटुंबाने गुरू मानलेला बाबा, बुवा, ज्योतिषी जेव्हा त्या कुटुंबातील स्त्रीवर लैंगिक अत्याचार करतो तेव्हा गुरुकृपेसाठी गुरूला संपूर्ण शरण जावे लागते हे गृहितक डोक्यात पक्के बसलेले असल्यामुळे भक्त महिला व तिचे कुटुंबीय हे त्या तथाकथित गुरूने केलेल्या लैंगिक अत्याचाराला गुन्हा न मानता तो गुरूचा 'कृपाप्रसाद' मानतात. जादूटोणाविरोधी कायद्याखाली दाखल झालेल्या एका केसमध्ये सांगली जिल्ह्यातील एका छोट्या गावातील एका दोन खोल्यांच्या घरात करणी उतरविण्यासाठी पूजा करण्याच्या नावे एका भोंदूने कुटुंबातील तरुण सुनेवर बलात्कार केला. तेव्हा त्या पीडितेचा नवरा व बाकी सर्व कुटुंबीय बाहेरच्या खोलीत बसले होते. पीडित व्यक्ती जर हातातील मणामणाच्या बेड्यांना फुलांचे गजरे मानून घेत असेल तर स्वतःवर अत्याचार होतोय हे समजायला व ते मान्य व्हायला अशा व्यक्तीला वेळ लागतो. स्वतः व आजूबाजूच्या सर्वांनी गहाण टाकलेल्या चिकित्सक बुद्धीला पुन्हा झळाळी देऊन पीडितेला बुवाने केलेल्या शोषणाविरुद्धची लढाई सुरू करावी लागते. वर उल्लेख केलेल्या केसमध्ये भोंदूने आपल्याला पुरते फसवले आहे हे ध्यानात आल्यावर या तरुणीचा नवरा तिच्यासोबत उभा राहिला आणि या प्रकरणी त्या बुवाला शिक्षा देखील झाली. पण भोंदूविरुद्धच्या लढाईमध्ये प्रत्येक पीडितेला पतीची वा कुटुंबीयांची साथ मिळेलच असे नाही.

ज्योतिषी अशोक खरातला अटक झाल्यानंतर 'बुवाबाजी आणि महिला' या विषयाबद्दलच्या चर्चेने समाज ढवळून निघत आहे. याबद्दलची विविध मते समोर येत आहेत. या मतांचा परामर्श घेतला तर स्त्रियाच

'तशा' असतात असे मानणारे बरेच लोक आजूबाजूला दिसतात. पीडिता एकीकडे कायदेशीर लढाई लढण्याचे कठीण काम करत असते तेव्हा पीडित स्त्री वरील अत्याचारासाठी तिलाच दोषी मानणाऱ्या या मानसिकतेशीही तिला झुंजावे लागते. 'ती स्वतःहून चालत गेली ना त्या बाबाकडे, कुणी उचलून तर नाही ना नेली?' किंवा 'लैंगिक अत्याचार घडतोय असे जाणवल्याक्षणी तिथून बाहेर का नाही पडली?' असे बोलून तिच्या मनात स्वतःच्या खरेपणाविषयी शंका निर्माण करणारे अनेक लोक तिच्या आजूबाजूला असतात. पीडित व्यक्तीप्रति असलेल्या लोकांच्या या प्रतिसादाला 'व्हिक्टिम ब्लेमिंग' म्हणतात आणि त्यामुळे गुन्हेगाराऐवजी दोषी व्यक्तीलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. भोंदूने केलेल्या अत्याचाराविरुद्ध पीडित स्त्री लढायचे ठरवते तेव्हा मानसिक पातळीवर तिला काय सोसावे लागते हे समजण्यासाठी 'व्हिक्टिम ब्लेमिंग' ही संकल्पना समजणे उपयोगी ठरते.

सत्तरच्या दशकात अमेरिकेत व्हिक्टिम ब्लेमिंग ही संकल्पना सर्वप्रथम वापरली गेली. गरीब माणसे स्वतःच त्यांच्या गरिबीला जबाबदार असतात किंवा विशिष्ट जात, धर्म, वंशाच्या लोकांवर अत्याचार होत असतील तर त्याला त्यांचे वर्तनच जबाबदार असते ही भावना हे 'व्हिक्टिम ब्लेमिंग' आहे. हा मुद्दा ही संकल्पना वापरून स्पष्ट करण्यात आला. लैंगिक अत्याचार पीडित स्त्रियांना समाज कशा नजरेने बघतो हे स्पष्ट करून त्याला विरोध करण्यासाठी पुढील काळात स्त्रीवादी वकिलांनी ही संकल्पना सातत्याने वापरली. आपल्या देशात देखील गेल्या काही वर्षांत ही संकल्पना हळूहळू रुजते आहे, पण खरात प्रकरणात किती लोक पीडित महिलांना दोष देत आहेत ते बघितले की, आपल्या समाजात ही संकल्पना पुरेशी रुजलेली नाही हे जाणवते.

स्वतःच्या व कुटुंबीयांच्या मनातील बुवाशरणतेशी झुंजून पीडित स्त्रीला तिची लढाई सुरू करावी लागते आणि नंतर समाजाकडून होणाऱ्या व्हिक्टिम ब्लेमिंगमुळे मोडून न पडता भोंदूविरुद्धचा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाणे गाठावे लागते. त्यानंतर न्याय मिळवण्यासाठी शासकीय यंत्रणेला चालना देण्याची तिची लढाई सुरू होते. शोषण करणाऱ्या ज्योतिषी, बुवा, बाबांच्या पाठीशी धर्मसत्ता, अर्थसत्ता आणि राजसत्ता एकवटली असेल तर बहुतेकवेळा एकट्या पडलेल्या स्त्रीला त्याच्याविरुद्ध उभे राहणे किती कठीण जात असेल हे आपल्या लक्षात येऊ शकते.

इतकी विषम लढाई लढणे सोपे नसते. जगातल्या अनेक देशांमध्ये गंभीर गुन्ह्यांमधील फियार्दी आणि साक्षीदारांना सरकारकडून संरक्षण पुरविण्याची कायदेशीर तरतूद आहे. अशा फियार्दी आणि साक्षीदारांना नवीन जागी नेऊन वसवणे, त्यांना संपूर्ण नवी कायदेशीर ओळख तयार करून देणे अशा बाबी याखाली केल्या जातात. माझ्या माहितीनुसार २०१८ साली सर्वोच्च न्यायालयाने साक्षीदार संरक्षणासंदर्भात दिलेले निर्देश आपल्याकडे अस्तित्वात आहेत, पण फियार्दी किंवा साक्षीदारांना संरक्षण देणारा कोणताही स्वतंत्र कायदा भारतात अस्तित्वात नाही. उद्या समजा असा कायदा झाला, तरी सरकारी यंत्रणा आपली एवढी मदत करेल यावर सामान्य भारतीय व्यक्ती विश्वास ठेवू शकेल का, याबद्दल शंका वाटते. ना मदत ना संरक्षण अशा परिस्थितीत ही विषम लढाई लढणे हे पीडितेसमोरील एक मोठे आव्हान ठरते. हे आव्हान पेलण्याची हिंमत दाखवणाऱ्या महिलेचं आपल्याला मनोमन कौतुक वाटायला हवं.

आपल्या देशात न्यायालयीन लढाई इतकी दीर्घकाळ चालते की पीडित महिलेला तिचे हे बळ किमान दहा-पंधरा वर्षे टिकवून ठेवावं लागतं. न्यायालयीन सुनावणीचा पाठपुरावा करताना आणि त्यासाठी उपस्थित राहताना तिला प्रत्येकवेळी जखमेवरची खपली निघण्याचा त्रास सोसावा लागतो. लढणाऱ्या व्यक्तीला अत्याचार आणि त्यातून झालेली वेदना विसरून पुढे जाण्याची मुभा नसते. न्यायालयीन लढाईसाठीचा खर्च, दगदग यामुळे होणारी ओढाताण तिला अनेक वर्षे सोसावी लागते. काळ जातो तसे साक्षीदार फुटण्याची शक्यता वाढते. त्यामुळे लढाईनंतर न्याय मिळेल याची खात्री नसते.

राम रहिम किंवा आसारामसारख्या दांडग्या बनलेल्या बाबा, बुवांबरोबर पीडितेची लढाई चालू असेल तर न्यायालयात तिच्या लढाईला यश आले व भोंदूला शिक्षा झाली तरी त्याचे प्रस्थ आणि समाजमनावरील त्याचा प्रभाव यांना ओहोटी लागल्याचे तिला अनुभवता येईल, असे नाही. राम रहीमच्या प्रकरणात तर त्याला शिक्षा झाल्यानंतर इतक्या वेळा पॅरोलवर तुरुंगाबाहेर सोडण्यात आले की, त्याची शिक्षा हा एक विनोद बनला. पीडितेच्या लढाईबद्दल निराशेचा सूर आळवण्यासाठी नाही तर पीडितेला किती विषम लढाई लढावी लागते हे अधोरेखित करण्यासाठी हे उदाहरण देत आहे.

लैंगिक शोषणाबद्दल समाज संवेदनशील असतो. त्यामुळे लैंगिक शोषणाचा बळी ठरलेल्या पीडित महिलेला किमान काही सहानुभूती आणि मदत आपल्या समाजात मिळू शकते. पण ज्योतिषी, बुवा, बाबा यांच्यासारखे लोक महिलांचे दुःख कुशलतेने हाताळून त्यांना भावनिकदृष्ट्या आपल्या कह्यात घेतात तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या महिलांच्या शोषणाला कोणीच वाली नाही, अशी स्थिती आहे. दोन वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये भोलेबाबा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका भोंदूबाबाच्या गाडीच्या टायरचा स्पर्श झालेली धूळ उचलण्यासाठी वाकलेल्या सुमारे शंभर भक्त महिला त्यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत मरण पावल्या. यानंतर सदर बाबा फरार झाला. काही दिवसांनी गदींचे नीट नियोजन न केल्याबद्दल कार्यक्रमाचे आयोजक आणि काही अधिकाऱ्यांना जबाबदार ठरवून त्या बाबाला दोषमुक्त करण्यात आले. बाबाच्या भक्तीच्या नावाखाली स्वतःचा जीव गमावलेल्या या शंभर पीडित महिलांना त्यांची लढाई लढण्याची संधीही कधी मिळणार नाही.

# 'तारीख पे...'चा चक्रव्यूह भेदायचा कसा?



भारताच्या सर्व न्यायालयांमध्ये मिळून तब्बल ५.५८ कोटी खटले प्रलंबित आहेत. यापैकी एकट्या सर्वोच्च न्यायालयात ९३ हजारांहून अधिक खटले आहेत. उच्च न्यायालयांत ६२ लाखांहून जास्त, तर जिल्हा न्यायालयांत ४.७ कोटींहून अधिक खटले निकालाच्या प्रतीक्षेत आहेत.

शिवसेना पक्ष, चिन्ह विवाद प्रकरणात १ एप्रिल रोजी सुनिर्धारित सुनावणी पुढे ढकलण्यात आली. आता २३ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. न्याय हा लोकशाहीचा कणा आहे. पण जेव्हा तो 'तारीख पे तारीख'च्या चक्रव्यूहात अडकतो, तेव्हा सामान्य नागरिकांचा विश्वास डळमळू लागतो.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरण हे सामान्य माणसाच्या अगदी सहज लक्षात राहण्यासारखं आहे. ज्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पक्ष निर्माण केला आणि ६० वर्ष जोपासला तो पक्ष आणि चिन्ह केवळ सत्तेच्या खालच्या पातळीवरच्या राजकारणासाठी बंडखोरी केलेल्या एकनाथ शिंदे गटाकडे सोपवून न्याय प्रलंबित ठेवला गेला आणि तारखेवर तारखा देण्यात आल्या. हे सर्वसामान्यांनी याची देही याची डोळा अनुभवले आहे. भारतीय लोकशाहीचे चार स्तंभ आहेत-विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, प्रसार माध्यम आणि न्यायपालिका. या चौथ्या स्तंभावर कोट्यवधी सामान्य नागरिकांचा अंतिम विश्वास असतो. राजकारणी खोटे बोलतात, नोकरशाही दिरंगाई करते, प्रसारमाध्यमेही काही वेळेस स्वार्थी होऊ शकतात, पण न्यायालय सत्य सांगेल असा भाबडा विश्वास सामान्य माणूस बाळगतो. परंतु आज हाच चौथा स्तंभ स्वतःच एका खोल, गंभीर आणि न संपणाऱ्या संकटात सापडला आहे. एकीकडे खटल्यांचा डोंगर वाढतो आहे, दुसरीकडे न्यायाधीश थकत आहेत आणि तिसरीकडे राजकीय प्रश्नांचे निकाल वर्षानुवर्षे रखडत राहिल्यामुळे लोकशाहीची गती मंदावते आहे. या त्रिकोणी संकटाचा सर्वाधिक भार सहन करतो तो मात्र सामान्य माणूस ज्याचा आवाज न्यायालयाच्या दरवाजापर्यंत पोहोचतो, पण निकालापर्यंत कधी पोहोचेल याची शाश्वती नसते.

## न्यायासाठी ५.५८ कोटी खटल्यांचा डोंगर

मार्च २०२६ च्या आकडेवारीनुसार भारताच्या सर्व न्यायालयांमध्ये मिळून तब्बल ५.५८ कोटी खटले प्रलंबित आहेत. यापैकी एकट्या सर्वोच्च न्यायालयात ९३ हजारांहून अधिक खटले आहेत. उच्च न्यायालयांत ६२ लाखांहून जास्त, तर जिल्हा न्यायालयांत ४.७ कोटींहून अधिक खटले निकालाच्या प्रतीक्षेत आहेत. हे आकडे तेव्हाच भयावह वाटतात जेव्हा लक्षात येते की, यापैकी १.८ लाखांहून अधिक खटले तब्बल ३० वर्षांपेक्षा जास्त काळापासून प्रलंबित आहेत. मार्च २०२५ ते मार्च २०२६ या एकाच वर्षात सर्वोच्च न्यायालयात १२ हजारांहून अधिक नवे खटले जमा झाले. निकाल होण्याचा वेग आणि नवे खटले दाखल होण्याचा वेग यांच्यातील दरी दिवसेंदिवस रुंदावत चालली आहे. परिणामी बॅकलॉग कमी होण्याऐवजी वाढत राहतो. 'तारीख पे तारीख' ही उपाधी आता इतकी परिचित झाली आहे की ती एक शापवाणी बनली आहे आणि या शापाचा सर्वाधिक फटका बसतो तो गरीब, असंघटित आणि संसाधनहीन नागरिकांना.

## न्यायाधीशांची दमछाक दहापट जास्त बोजा

भारतात प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे केवळ १५ न्यायाधीश आहेत. अमेरिकेत हेच प्रमाण १५० आहे, कॅनडात ६५ आहे. म्हणजेच भारतीय न्यायव्यवस्थेवर अमेरिकेच्या तुलनेत दहापट अधिक बोजा आहे. एकेका न्यायाधीशाच्या खांद्यावर सरासरी २,२०० हून अधिक खटले असतात. हा केवळ कामाचा बोजा नाही. हा एका माणसाने सहन करण्याची मर्यादा ओलांडलेला ताण आहे. अशा परिस्थितीत न्यायाधीश प्रत्येक खटल्याला पुरेसा वेळ आणि विचार देऊ शकतात का, हा प्रश्न केवळ वेळेचा नाही, तर न्यायाच्या गुणवत्तेचाही आहे. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांच्या मंजूर जागा ३४ आहेत. उच्च न्यायालयांत हजाराहून अधिक जागा रिक्त आहेत. जिल्हा न्यायालयांची स्थिती तर याहून बिकट आहे. न्यायाधीश नियुक्तीची प्रक्रिया केंद्र सरकार आणि कॉलेजियम यांच्यातील समन्वयाभावामुळे वषार्नुवर्षे रखडते. परिणामी ज्या ठिकाणी अधिक न्यायाधीशांची तातडीने गरज आहे, तिथे जागा रिकाम्या राहतात आणि खटल्यांचा भार वाढत राहतो. हे एक न संपणारे दुष्टचक्र आहे ज्याकडे कोणीही गांभीर्याने लक्ष द्यायला तयार नाही.

## शिवसेना खटला एका प्रकरणाचा आरसा

शिवसेनेचे नाव आणि 'धनुष्य-बाण' चिन्हाचा वाद हे केवळ एका राजकीय पक्षाचे प्रकरण नाही. तो भारतीय लोकशाहीच्या मूलभूत प्रश्नांचा कसोटीचा खटला आहे. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात बंड पुकारले आणि ४० आमदारांसह सत्ता स्थापन केली. फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने शिंदे गटाला 'असली शिवसेना' ठरवून 'धनुष्य-बाण' चिन्ह दिले. उद्धव ठाकरे यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. तेव्हापासून आजपर्यंत म्हणजे तीन वर्षांहून अधिक काळ हे प्रकरण सुनावणी, स्थगिती आणि पुढच्या तारखांच्या फेऱ्यात अडकले आहे. या एकाच खटल्यात किती प्रश्न गुंफलेले आहेत ते पाहिले तर त्याची व्याप्ती लक्षात येते. 'धनुष्य-बाण' चिन्ह कुणाचे? 'शिवसेना' नाव कुणाचे ? ४० आमदारांची अपात्रता वैध आहे का? विधानसभा अध्यक्षांचा निर्णय घटनाबाह्य आहे का ? निवडणूक आयोगाच्या अधिकारांची मर्यादा काय? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देशाच्या राजकीय इतिहासावर दीर्घकाळ परिणाम करणारे आहे. शिवाय राष्ट्रवादीचा 'घड्याळ' चिन्ह विवादही याच न्यायपीठासमोर एकत्र चालवला जात आहे. थोडक्यात महाराष्ट्राच्या दोन प्रमुख पक्षांचे भवितव्य एकाच वेळी दोलायमान अवस्थेत आहे. या प्रकरणांची जानेवारी २०२६ मध्ये अंतिम सुनावणी सुरू झाली. मार्चमध्ये महत्त्वाची बाजू मांडली गेली. १ एप्रिल रोजी सुनिर्धारित सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात आली. आता २३ एप्रिल २०२६ ही नवी तारीख आहे. 'पुढच्या तारखेला नक्की होईल' असे किती वेळा म्हटले गेले याची मोजदाद करणे कठीण आहे. दरम्यान, महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येतात आणि जातात, नागरिक मतदान करतात, पण कोणता पक्ष खरा हे न्यायालयाला अजून ठरवता आलेले नाही. हा विरोधाभास लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे.

व्यवस्थेतील मूळ दोष हा इंग्रजांचा वारसा भारताची न्यायव्यवस्था मूलतः ब्रिटिशकालीन चौकटीत बसवलेली आहे. तोंडी युक्तिवादांवर अतिरिक्त भर, हस्तलिखित साक्षी, न्यायालयीन कार्यालयांतील कागदी फाइल्स या सगळ्या गोष्टी डिजिटल युगातही मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. सरकार हे देशातील सर्वात मोठे वादी आहे. ५० टक्के प्रलंबित खटल्यांत एक बाजू सरकारची असते. सर्वोच्च न्यायालयात मंजूर झालेल्या खटल्यांपैकी ७३ टक्के प्रकरणांत सरकार एक बाजू आहे. सरकारने अनावश्यक अपील दाखल करणे बंद केले तर न्यायालयांवरचा बोजा एका झटक्यात लक्षणीयरीत्या कमी होईल. 'नॅशनल लिटीगेशन पॉलिसी' २०१० मध्ये तयार झाली, पण तिची अंमलबजावणी आजही 'विचाराधीन' आहे. हा विरोधाभास आपल्या व्यवस्थेचे आजचे वास्तव सांगतो. समस्या माहीत आहे, उपाय माहीत आहे, पण अंमलबजावणीची इच्छाशक्ती नाही. भारताचे न्यायालयीन बजेट देशाच्या एकूण बजेटच्या केवळ ०.०८ टक्के आहे. जे देश न्यायव्यवस्थेला प्राधान्य देतात ते या तुलनेत कितीतरी जास्त खर्च करतात.

## सामान्य माणसाची किंमत 'अंडरट्रायल'चा शाप

भारताच्या तुरुंगांमध्ये ७७ टक्के कैदी हे तुरुंगांमध्ये 'अंडरट्रायल' आहेत, म्हणजे ज्यांच्यावर आरोप अद्याप सिद्ध झालेले नाहीत, पण खटला चालू असल्यामुळे ते तुरुंगात आहेत. यापैकी अनेकांचे खटले इतक्या काळ चालतात की, तुरुंगात राहिलेला कालावधी त्यांच्या कथित गुन्ह्यासाठी मिळणाऱ्या शिक्षेपेक्षाही जास्त होतो. ही परिस्थिती अत्यंत शोचनीय आहे.

# मैत्रीआडून भयंकर अत्याचार



अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे गेल्या तीन आठवड्यांपासून महिलांवरील कथित लैंगिक अत्याचार आणि आक्षेपार्ह व्हिडीओ प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. आयान अहमद आणि उजेरखान या दोन तरुणांनी हे कृत्य केल्याचे समोर आले असून, दोघेही सध्या पोलिसांच्या कोठडीत आहेत. याव्यतिरिक्त पोलिसांनी इतर काही संशयितांनाही ताब्यात घेतले असून त्यांची सखोल चौकशी सुरू आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस खात्याने तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन केले आहे. परतवाडा हे अमरावती जिल्ह्यातील एक महत्त्वाचे औद्योगिक शहर असून ते जिल्ह्यापासून ४० ते ५० किमी अंतरावर आहे. या शहराला लागूनच अचलपूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. परतवाडा हे एकेकाळी कापसाच्या जिनिंग-प्रेसिंग मिल्ससाठी प्रसिद्ध होते आणि आजही येथे मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो. २०११ च्या जनगणनेनुसार, परतवाड्यात हिंदू लोकवस्ती लक्षणीय आहे, तर अचलपूरमध्ये मुस्लीम वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. अचलपुरात रोजगाराच्या संधी कमी असल्याने तिथली बहुतांश मंडळी रोजीरोटीसाठी गजबजलेल्या परतवाडा शहरात येत असतात. आयान अहमद या १९ वर्षीय तरुणाने असंख्य हिंदू आणि मुस्लीम मुलींशी मैत्री केली होती. तरुणींवर प्रभाव पाडण्यासाठी तो महागड्या गाड्यांचा वापर करायचा. पोलिसांनी या गाड्यांचा तपास केला असता, आयानच्या वडिलांचा जुन्या गाड्यांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय असल्याचे समोर आले. वडिलांकडे विक्रीसाठी येणाऱ्या नवनवीन महागड्या गाड्या घेऊन तो मुलींना प्रभावित करत असे. यात त्याचा साथीदार उजेरखानही सहभागी होता. हे दोघेही मुलींना जाळ्यात ओढून त्यांच्याशी अश्लील चाळे करायचे आणि त्याचे व्हिडीओ बनवायचे. त्यानंतर हे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तरुणींना ब्लॅकमेल केले जायचे आणि त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले जायचे, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. आयान आणि उजेर यांची चौकशी सुरू होताच या प्रकरणाला धार्मिक रंग देण्यास सुरुवात झाली. काही हिंदुत्ववादी संघटनांनी याला 'लव जिहाद'चा प्रकार संबोधत 'परतवाडा बंद'ची हाक दिली होती, ज्याला प्रतिसादही मिळाला. दरम्यान, राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारेखान यांनी एक अभ्यास गट पाठवून पीडित तरुणी या मुस्लीमच असल्याचा दावा केला. भाजप प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनीही याला दुजोरा दिला. मात्र, जाणकारांच्या मते यात हिंदू मुलीही मोठ्या प्रमाणात गुंतलेल्या आहेत. पोलिसांनी पीडित तरुणींच्या कुटुंबीयांना तक्रार करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले असून, त्यांची ओळख गुप्त ठेवली जाईल असे आश्वासन दिले आहे. मात्र, सामाजिक बदनामीच्या भीतीने अनेक कुटुंबे पुढे येण्यास धजावत नाहीत. सध्या केवळ मुस्लीम तरुणींच्याच तक्रारी आल्याचे सांगितले जात असले, तरी सूत्रांच्या माहितीनुसार एका हिंदू अल्पवयीन मुलीच्या आईनेही तक्रार दाखल केली असून त्याची चौकशी सुरू आहे. गावात अशी चर्चा आहे की, हे अश्लील व्हिडीओ विकून आयान आणि उजेर पैसे कमवत होते. मात्र, पैशांच्या वाटपावरून किंवा इतर कारणावरून दोघांमध्ये खटके उडाले आणि उजेरनेच हे बिंग फोडले. त्यानंतरच या धक्कादायक प्रकरणाचा उलगडा झाला. सध्या हिंदुत्ववादी संघटना या विषयात प्रचंड आक्रमक आहेत. अमरावतीत विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी काही पत्रकारांना या प्रकरणाशी संबंधित सुमारे २०० अश्लील व्हिडीओ दाखवल्याचे वृत्त आहे. यावर खासदार डॉ. अनिल बोंडे आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी आक्रमक भूमिका घेत हा 'लव जिहाद'चा प्रकार असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाची पाळेमुळे खोदून काढण्याची मागणी त्यांनी केली आहे. दुसरीकडे, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारेखान या प्रकरणावर पांघरूण घालत असल्याचा आरोप होत असून जनसामान्यांमध्ये त्याबद्दल नाराजी आहे. परिस्थिती चिघळू नये म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व राजकीय नेत्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

सावधान

# तुम्हीही फेस वॉशनंतर टॉवेलचा वापर करता? त्वचेचं होतंय गंभीर नुकसान

तुम्ही देखील शरीर आणि चेहरा पुसण्यासाठी टॉवेलचा वापर करत असाल. इतकंच नाही तर फेस वॉश केल्यानंतरही पुन्हा याच टॉवेलचा वापर होत असेल. आता तुम्ही असा विचार करत असाल की यामध्ये नेमकी समस्या काय आहे? एकाच टॉवेलचा वारंवार वापर केल्यास तुमच्या त्वचेचं गंभीर नुकसान होऊ शकते. अस्वच्छ टॉवेलचा वापर केल्यास चेहऱ्यावर मुरुम येऊ शकतात. तसंच याच टॉवेलचा दिवसभरात सातत्यानं वापर केला तर त्वचेवरील नैसर्गिक तेल कमी होण्याची भीती असते. यामुळे त्वचा कोरडी होऊन निस्तेज दिसू लागते. त्वचेचं नुकसानच होत असल्यानं चेहरा पुसण्यासाठी तुम्ही टॉवेलचा वापर करणं थांबवल्यास उत्तम. जाणून घेऊया चेहरा पुसण्यासाठी टॉवेलचा उपयोग कसा करावा आणि यामुळे त्वचेवर कोणकोणते दुष्परिणाम होऊ शकतात.

### मुरुमांची समस्या

काही जण नियमित स्वरुपात टॉवेल स्वच्छ धुवत नाहीत. ज्यामुळे टॉवेलवर मोठ्या प्रमाणात सूक्ष्म जीवजंतूंची पैदास होते. याच टॉवेलचा वापर तुम्ही चेहरा पुसण्यासाठी केल्यास त्वचेच्या कित्येक गंभीर समस्या उद्भवू शकतात. विशेषतः मुरुमांची समस्या. चेहरा धुतल्यानंतर पुसण्यासाठी टॉवेलऐवजी टिशू पेपरचा वापर करावा. टिशू पेपर देखील स्वच्छ आणि कोरड्या ठिकाणी ठेवावा. टिशू पेपरवर धूळ जमा झालेली असल्यास त्याचा वापर करू नये.

### त्वचा होऊ लागते कोरडी

आपल्या चेहऱ्यावरील त्वचा अतिशय संवेदनशील असते. यामुळे अस्वच्छ टॉवेलचा वापर केल्यास त्वचेचं नुकसान होऊ शकते. टॉवेलच्या वापरामुळे त्वचेचा पोत बिघडतो. शिवाय, त्वचेवरील नैसर्गिक तेल देखील कमी होऊ लागते. ज्यामुळे त्वचा कोरडी आणि निस्तेज होते. ही समस्या टाळण्यासाठी तुम्ही कितीही प्रमाणात मॉईश्चराइझरचा वापर केला तरीही तुमची त्वचा कोरडीच राहते. त्वचा कोरडी होऊ नये, यासाठी जितके शक्य होईल तितके टॉवलचा उपयोग करणं टाळा.

### कोणत्याही प्रोडक्टचा होत नाही परिणाम

तुमच्या चेहऱ्याची त्वचा मुळातच कोरडी आहे. यावर उपाय म्हणून तुम्ही कितीही महागडे क्रीम अथवा मॉईश्चराइझर वापरले तरीही त्यापासून कोणताच फायदा होणार नाही. कारण तुमची त्वचा क्रीम किंवा मॉईश्चराइझर योग्य पद्धतीनं शोषून घेत नाही. अशा परिस्थितीत त्वचा थोडीशी ओलसर वाटल्यास चेहऱ्यावर क्रीम किंवा लोशन लावा. ही समस्या टाळण्यासाठी टॉवेलनं चेहरा पुसण्याची चूक करू नका. चेहरा धुतल्यानंतर पाणी थोडा वेळ चेहऱ्यावर तसेच राहू द्या किंवा टिशू पेपरचा वापर करा.

### सुरकुत्यांची समस्या

वृद्धत्वापूर्वीच आपल्या चेहऱ्यावर सुरकुत्या येऊ नये, यासाठी आतापासूनच टॉवेलचा वापर करणं थांबवा. आपल्या चेहऱ्याची त्वचा अतिशय नाजूक असते. यामुळे जाडसर किंवा खरखरीत टॉवेलचा वापर करू नये. वापर केल्यास चेहऱ्यावरील नैसर्गिक चमक, ओलावा नाहीसा होण्याची शक्यता आहे. चेहऱ्याची देखभाल योग्य पद्धतीनं व्हावी, यासाठी प्रत्येक गोष्ट सौम्य स्वरुपातीलच असेल याची काळजी घ्या.

### नियमित स्वच्छ टॉवेलचा करा वापर

चेहरा पुसण्यासाठी नियमित स्वच्छ टॉवेलचा वापर केल्यास आपली त्वचा सूक्ष्म जीवजंतूंच्या संपर्कात येण्यापासून रोखली जाऊ शकते. चेहरा स्वच्छ धुताना त्वचा रगडण्याची चूक करू नका. यामुळे त्वचेचा पोत बिघडू शकतो. शिवाय, टॉवेलचा वापर करून झाल्यानंतर तो गरम पाण्यानं धुवा. कोमट किंवा थंड पाण्याच्या तुलनेत गरम पाण्याचा वापर केल्यास त्यावरील जीवजंतूचा खात्मा होतो. गंभीर त्वचेच्या समस्या टाळण्यासाठी या गोष्टी फॉलो करा.



# रिकाम्या पोटी प्या जिऱ्याचं पाणी आणि बघा जादू!

**जिऱ्याच्या पाण्याचे कसे फायदे होतात ते पाहूया -**

### १. पचनाची प्रक्रिया निरोगी ठेवण्यासाठी फायदेशीर

जिऱ्याच्या पाण्यात अँटिऑक्सिडंट्स, विटामिन्स आणि मिनरल्स असतात. हे आपली पचनप्रक्रिया सुधारण्यासाठी अधिक फायदेशीर ठरते. डायजेस्टिव्ह सिस्टिम अर्थात पचनतंत्राला अधिक निरोगी ठेवण्याचं काम जिऱ्याचं पाणी करतं. त्याशिवाय हे प्यायल्याने उलटी - जंत, मॉर्निंग सिकनेस आणि बद्धकोष्ठ यासारख्या त्रासांपासूनही सुटका मिळते. जिऱ्याच्या पाण्याने शरीरामध्ये इंजाइम तयार होतात जे कार्बोहायड्रेट, चरबी अर्थात फॅट आणि ग्लुकोज या गोष्टी पचवण्यासाठी सहायक म्हणून काम करतात.

### २. अँटिऑक्सिडंट्सच जास्त प्रमाण

जिऱ्यामध्ये जास्त प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीरात एकत्र येणाऱ्या विषारी पदार्थांना बाहेर काढून टाकण्यास मदत करतात. यामुळे शरीरातील आतील भाग हा योग्य तऱ्हेने काम करतो. जिरं तुम्ही थोड्याशा पाण्यात रात्रभर भिजवून ठेवा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी हे पाणी प्या यामुळे तुमच्या लिव्हरमधील बाईल प्रॉडक्शन वाढतं. ज्यामुळे तुम्हाला ॲसिडिटी अथवा गॅसच्या समस्या असतील तर त्यातून सुटका मिळते. बाईल हा असा एक तरल पदार्थ आहे ज्याचं निर्माण लिव्हर करत असतं. चरबी पचवायचं काम बाईल करत असतं. त्यामुळे जिऱ्याचं पाणी पिणं हा यावर उत्तम उपाय आहे.

### ३. प्रतिकारशक्ती वाढवण्यास होते मदत

जिऱ्याचं पाणी हा आयरनचा खूपच चांगला स्त्रोत आहे. आयरन अर्थात लोह चांगलं असेल तर तुमच्या शरीरातील प्रतिकारशक्तीचं काम योग्य प्रमाणात होतं. या जिऱ्याच्या पाण्यामध्ये विटामिन ए आणि विटामिन सी असल्याने दोन्ही अँटिऑक्सिडंटचं काम योग्य प्रकारे करते. जिऱ्याचं पाणी तुम्ही रोज प्यायल्यास, प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत मिळते आणि तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहाता. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तुमचं वजन वाढू देत नाही.

### ४. चांगली झोप मिळते

लठ्ठपणा वाढल्यामुळे झोप न येणं ही अतिशय कॉमन समस्या आहे. तुम्हाला जर अशी समस्या असेल तर तुम्ही जिऱ्याचं पाणी नियमित प्यायलाच हवं. यामुळे तुम्हाला चांगली झोप मिळते आणि तुमचं शरीर अधिक निरोगी राहण्यास मदत मिळते.

### ५. शरीराची सफाई

जिऱ्याचं पाण्यात फायबर असतं जे शरीरातील टॉक्झिन अर्थात विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यासाठी फायदेशीर ठरतं. शरीराची योग्य सफाई होण्यासाठी या पाण्याचा उपयोग होतो. आपल्या शरीराला योग्य हायड्रेट ठेवून वजन कमी करण्यासाठीही या पाण्याचा तुम्ही उपयोग करून घेऊ शकता. जिऱ्याचं पाणी आपल्या शरीराला खूप फायदे मिळवून देतं.





# वजन कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते ब्ल्यू टी

सध्याच्या लाईफस्टाईलमुळे वजन वाढण्याचं प्रमाण वाढलं आहे. मग अशावेळी वजन कमी करण्यासाठी विविध प्रकार केले जातात. कोणी योगा करतं तर कोणी सतत जिमच्या फेऱ्या वाढवतं. तर बरेच जण वजन कमी करण्यासाठी विविध चहांचा अर्थात टी चा वापर करतात. त्यामध्ये ग्रीन टी चा वापर सर्वात जास्त करण्यात येतो. पण आता वजन कमी करण्यासाठी एक नवा प्रकार वापरण्यात येतो आणि त्याला ब्लू टी असं म्हटलं जातं. प्युअर हर्बल टी असणारा हा ब्लू टी अपराजिताच्या निळ्या फुलांपासून तयार करण्यात येतो. या टी ला बटरफ्लाय नावानेदेखील ओळखलं जातं. निळ्या अपराजिताच्या फुलांना उकळवून हा चहा तयार करण्यात येतो आणि याचे अनेक फायदे आहेत. तुम्हाला जर या चहाचे फायदे जाणून घ्यायचे असतील तर आम्ही तुम्हाला याविषयी सांगणार आहोत. खरं तर दक्षिण - पूर्व आशियामध्ये हा ब्ल्यू टी जास्त प्रमाणात प्रसिद्ध आहे. हा चहा केवळ स्वादिष्ट नाही तर याचा सुगंधदेखील सुंदर असतो. शिवाय याचा तुमच्या शरीरालाही उत्तम फायदा होतो. अँटिऑक्सिडंट्सचे पावरहाऊस म्हणून ब्लू टी ओळखण्यात येतो.

**मधुमेहापासून करते बचाव :** तुम्हाला जर मधुमेहासारखा आजार असेल तर तुम्ही ब्लू टी चा वापर नक्की करायला हवा. शरीरात रक्तामधील साखरेची पातळी आणि ग्लुकोज मॅनेज करण्यासाठी ब्लू टी चा चांगला वापर होतो. इतकंच नाही तर शरीरात कोणत्याही तऱ्हेचं इन्फेक्शन झालं तर तुम्हाला ब्लू टी च्या मदतीने ते इन्फेक्शन दूर करता येतं. रोज कमीत कमी दोन कप ब्लू टी पिण्याने तुमच्या या समस्या दूर होण्यास मदत मिळते. त्यामुळे तुम्हालाही अशा समस्या असतील तर वेळेवर ब्लू टी पिण्यास तुम्ही सुरुवात करा.

**तणावाची पातळी होते कमी :** ब्लू टी तुमच्या तणावाची पातळी कमी करण्यासाठीही मदत करते. ब्लू टी पिण्यामुळे मेंदूमध्ये तयार होणारे हार्मोन्स वाढतात आणि त्यामुळे तणाव कमी होण्यास मदत मिळते. तसंच कार्टिसोलसारख्या हार्मोन्सना बाहेर काढून टाकण्यासाही याची मदत मिळते. ज्यामुळे तुमच्या डोक्यावर येणारा तणाव थांबण्यास मदत मिळते. ब्लू टी पिण्यामुळे तुम्हाला चांगली झोप मिळते आणि शरीर रिलॅक्स होण्यास मदत मिळते.

**त्वचा आणि केसांसाठी अधिक फायदेशीर :** ब्लू टी मध्ये अधिक अँटिऑक्सिडंट्स असल्याने आपल्या त्वचा आणि केसांसाठी याचा अधिक फायदा होतो. तुम्हाला हे समजल्यावर आश्चर्य वाटेल की, या चहामध्ये विटामिन्स आणि मिनरल्सचा भरणा असतो जे तुमच्या त्वचेसाठी अँटीएजिंगचं काम करतात आणि केसांना अधिक चमक आणण्यासाठी आणि मजबूती आणण्यासाठी फायदा मिळतो.

**कॅन्सरसाठीही होतो फायदा :** ब्लू टी मध्ये असणारे अँटीऑक्सिडंट्स हे कॅन्सर रोखण्यासाठी फायदेशीर ठरतात. शरीरातील कॅन्सरच्या पेशींची वाढ रोखण्यासाठी याची मदत मिळते. अँटीऑक्सिडंट्स आणि यामध्ये आढळणारे मिनरल्स हे तुमच्या शरीरातील सेल्सना नुकसान पोहचवत नाहीत आणि त्यामुळे कॅन्सर होण्याचा धोका टळतो. त्यामुळे ब्लू टी चा नियमित तुमच्या आयुष्यात तुम्ही उपयोग करून घ्यायला हवा.

# ‘माखनी ग्रेव्ही’

**‘माखनी ग्रेव्ही’साठी लागणारा साहीत्यः**

- ५ मोठे टोमॅटो, लालबुंद आणि रसदार
- १ टिस्पून गरम मसाला
- १ टेस्पून आलेलसूण पेस्ट
- १ टिस्पून लाल तिखट
- १ टिस्पून कश्मीरी रेड चिली पाउडर किंवा चिमूटभर लाल रंग
- १ टिस्पून धणेपूड
- १/२ टिस्पून कसूरी मेथी
- १/२ टिस्पून जिरेपूड
- २ टिस्पून लिंबू रस
- १/४ ते १/२ कप हेवी क्रीम
- चवीपुरते मिठ
- २ टेस्पून बटर
- १/२ टीस्पून साखर (ऐच्छिक)

**‘माखनी ग्रेव्ही’ची कृती :**

- टोमॅटो मोठ्या खोलगट काचेच्या भांड्यात ठेवावे. टोमॅटो बुडेस्तोवर पाणी घालावे. ५ ते ७ मिनिटे मायक्रोवेवमध्ये शिजवून घ्यावे. पाणी काढून घ्यावे. आणि फक्त टोमॅटो काढून मिक्सरमध्ये प्युरी करून घ्यावी. हि प्युरी गाळून त्यातील बिया आणि साले काढून टाकावीत.
- पॅनमध्ये बटर गरम करून त्यात आले-लसूण पेस्ट आणि लाल तिखट घालावे.१० ते १५ सेकंद परतावे. यात गाळलेली टोमॅटो प्युरी, धणे-जिरेपूड, कसूरी मेथी, मीठ आणि लिंबाचा रस घालावे. १० मिनिटे मंद आचेवर ढवळावे.
- टोमॅटोचा कच्चा वास गेला कि गॅस बंद करावा. हे मिश्रण थोडे कोमट होवू द्यावे. ब्लेंडरमध्ये घालावे. ७-८ सेकंद ब्लेंड करावे. २-३ टेस्पून हेवी क्रीम घालून ब्लेंड करावे. अशाप्रकारे थोडेथोडे क्रीम घालून ब्लेंड करत राहा. ग्रेव्ही हवी तेवढी क्रिमी झाली कि क्रीम घालणे थांबवावे.
- हि ग्रेव्ही परत पॅनमध्ये घालावी आणि एकदम मंद आचेवर साधारण ५ मिनिटे गरम करावी.
- हि ग्रेव्ही पनीर माखनी किंवा बटर चिकन बनवण्यासाठी वापरू शकतो.

# त्वचा भाजली तर करा त्वरीत घरगुती उपचार

बऱ्याचदा घरी जेवण बनवताना अथवा एखाद्या वेळी पूजा करताना हात भाजणं अथवा त्वचा भाजणं हे कॉमन आहे. काही लहान मुलं धांदरटपणा करताना हात भाजून घेतात. पण हे सगळं खूपच त्रासदायक असतं. कारण त्वचेवर एकदा का भाजण्याचा डाग राहिला किंवा त्याचे फोड झाले तर त्याचा प्रचंड त्रास होतो. त्यामुळे जर त्वचा भाजली तर त्वरीत घरगुती उपचार नक्की काय करायला हवेत हे माहीत असणं अत्यंत आवश्यक आहे. कारण प्रत्येक वेळी डॉक्टरांकडे धाव घेणं शक्य होत नाही. किमान डॉक्टरांकडे जाईपर्यंत तरी त्यावर तातडीने उपचार व्हायला हवेत. त्यासाठी आपल्याला काही मूलभूत घरगुती उपचार माहिती असणं गरजेचं आहे. भाजणं हे अनवधानाने होत असतं. ते रोखणं आपल्या हातात नक्कीच नाही. पण असं झाल्यानंतर त्वरीत उपचारासाठी काय करायला हवं हे माहीत करून घेणं नक्कीच आपल्या हातात आहे. तज्ज्ञांच्या मते भाजल्यानंतर पहिली १५ मिनिट्स ते अर्धा तास हा काळ अत्यंत महत्त्वाच असतो. या कालावधीत आपण घरगुती उपचार योग्य तऱ्हेने करणे अत्यंत आवश्यक असते. आम्ही या लेखातून तुम्हाला असेच काही महत्त्वाचे घरगुती उपचार सांगणार आहोत ज्यामुळे त्वचा भाजल्यावर तुम्ही त्वरीत ते करून त्याची तीव्रता कमी करू शकता.



**कोल्ड कंप्रेस :** त्वचा भाजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा कोल्ड कंप्रेससारखा पर्याय वापरायला हवा. त्यासाठी थंड पाण्यातून पिळून काढलेला स्वच्छ कपडा भाजलेल्या ठिकाणी ठेवा. तुम्हाला होणारी जळजळ आणि त्रासातून हा उपाय नक्की दिलासादायक ठरतो. साधारण ५ ते १५ मिनिट्सच्या अंतरात तुम्ही याचा वापर करू शकता. प्रयत्न करा की, कंप्रेस जास्त थंड असू नये, कारण यामुळे जळजळ अधिक वाढू शकते.

**अँटीबायोटिक्स औषध :** कोणत्याही भाजलेल्या ठिकाणी त्वचेवर तुम्ही सर्वात पहिले अँटीबायोटिक्स औषध अथवा क्रिम लावायला हवे. हे संक्रमण थांबवण्यास मदत करते. तसंच या ठिकाणी औषध लावल्यानंतर हा भाग तुम्ही एका स्वच्छ कपड्याने कव्हर करून घ्या.

**व्हॅनिला :** जर तुम्हाला थोडंसं भाजलं असेल तर त्यावर व्हॅनिला हा उत्तम घरगुती उपाय आहे. तुम्ही भाजलेल्या त्वचेवर हळूवारपणे व्हॅनिलामध्ये कापूस ओला करून घ्या आणि तो त्या भागावर लावा. व्हॅनिलाचा अर्क हा त्रास कमी करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी उत्तम ठरतो.

**कोरफड :** कोरफडमध्ये अँटीइन्फ्लेमेटरी गुण आढळतात जे भाजलेल्या त्वचेवर असणाऱ्या बॅक्टेरियांचा विकास करण्यासाठी नियंत्रण आणते. तुमची त्वचा कधी भाजली तर तुम्ही त्वरीत त्यावर कोरफडचे पान अथवा कोरफडमधील जेल काढून लावा. यामुळे होणारी जळजळ कमी होईल. जर तुम्ही बाजारातून कोरफड आणली असेल तर लक्षात ठेवा की, यामध्ये अधिक कलरिंग अथवा सुगंध नसावा. घरात लावलेली कोरफड असेल तर तुम्ही ती तशीच लाऊ शकता.

**ब्लॅक टी :** त्वचा भाजल्यानंतर ब्लॅक टी हादेखील उत्तम घरगुती उपाय आहे. ज्यामुळे जळजळ कमी होते आणि होणारा त्रासही लवकर कमी होतो. काहीच नसेल तर तुम्ही त्वचा भाजल्यावर ब्लॅक टी चा वापर करू शकता. यासाठी तुम्ही दोन अथवा तीन थंड ब्लॅक टी च्या लहान पिशव्या थंड करून भाजलेल्या ठिकाणी लावा.

**थंड पाणी :** आग अथवा गरम पाण्याने तुमची त्वचा भाजली असेल तर तुम्ही त्वरीत त्यावर थंड पाणी लावा. हा सर्वात उत्तम उपाय आहे. कमीत कमी २० मिनिट्स तुम्ही थंड पाण्याची बाटली अथवा बर्फ भाजलेल्या ठिकाणी लावा. यामुळे जळजळ कमी होऊन तुम्ही पुढे साध्या पाण्याने धुवा. त्यानंतर पुढचा उपचार करा. किती भाजलं आहे त्यावर पुढील उपचार अवलंबून आहे.

**मध :** मध केवळ खोकल्यासाठीच उपयोगी आहे असे नाही. तर आपल्या स्वादासह भाजल्यानंतरही याचा उपयोग करून घेता येतो. वास्तविक मधामध्ये अँटीइन्फ्लेमेटरी, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुण असतात, जे भाजलेल्या त्वचेवर होणाऱ्या जळजळीपासून सुटका मिळवून देतात.

**गाजर :** तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल पण जर तुम्हाला सणासुदीला फटाक्यांमुळे त्रास झाला आणि भाजले तर तुम्ही याचा उपयोग करून घेऊ शकता. फटाक्यांनी त्वचा भाजली तर त्याची जखम भरून काढण्यासाठी गाजर हा चांगला पर्याय आहे. गाजर किसून तुम्ही या ठिकाणी लावा. तुम्हाला परिणाम दिसून येईल.

**बटाट्याचा रस :** भाजलेल्या ठिकाणी बऱ्याचदा डाग तसेच राहतात. ते नको असतील तर तुम्ही बटाट्याच्या रसाचा वापर करा. केवळ बटाट्याचा रसच नाही तर बटाट्याचे सालही त्यावर चांगला उपाय आहे. एक बटाटा कापून तुम्ही भाजलेल्या ठिकाणी लाऊन ठेवा. प्राथमिक भाजले असेल अथवा फटाक्यांनी भाजले असेल तर तुम्ही हा घरगुती उपाय करू शकता.

# पोट दुखत आहे... डोंटवरी हे घरगुती उपाय करून पहा

- दहा ग्रॅम गुळ व अर्धा चमचा खायचा चुना एकत्र करून त्याची एक गोळी तयार करावी. ही गोळी एक ग्लास कोमट पाण्यासोबत घेऊन थोडी झोप घ्यावी. थोड्याच वेळेत पोटदुखीवर आराम पडेल.
- जर पोट फारच जोराने दुखत असेल तर आल्याच्या रसामध्ये मध मिसळून त्याचे सेवन करावे. असे केल्याने पोट दुखणे थांबते.
- अर्धा चमचा हळद आणि अर्धा चमचा मीठ एकत्र करून थंड पाण्यासोबत घेतल्याने पोट दुखणे थांबण्यास मदत होते.
- अर्धा चमचा आल्याचा रस व अर्धा चमचा लिंबाच्या रसामध्ये थोडेसे पादरे मीठ टाकून प्यायल्याने पोट दुखी थांबते.



- बिना दूधाचा चहा (कोरा चहा) प्यायल्यानेदेखील पोट दुखणे थांबते. त्यात थोडा लिंबाचा रस टाकल्यास लवकर असर होतो.
- एक ग्लास कोमट पाण्यात एक चमचा बेकिंग सोडा एकत्र करून प्यायल्याने पोट दुखी लगेच थांबते
- चांगल्या प्रकारे शिजलेले तांदूळ एका कॉटनच्या कपड्यात बांधून शेकल्यास पोट दुखी थांबते.
- एक ग्लास पाण्यामध्ये थोडासा गोड सोडा टाकून प्यायल्याने पोट दुखणे थांबते.
- सुंठ, जीरा आणि काळी मिरी सम प्रमाणात घेवून त्याचे चूर्ण बनवून घ्यावे. गरम पाण्यासोबत एक चमचा हे चुर्ण घेतल्याने पोट दुखणे थांबते.

# आजच्या काळातंही तुम्हाला सौंदर्य मिळवून देतात या ‘पुरातन’ गोष्टी

आपल्या सौंदर्याबद्दल नेहमीच प्रत्येक महिला असते. त्यामुळे आपण नेहमी सुंदर दिसावं यासाठी रोज काहीतरी नवनवीन बऱ्याच जणी करत असतात. आपली त्वचा नेहमी तजेलदार दिसावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण त्यासाठी सतत महाग उत्पादनांवर खर्च करण्याची गरज नाही. त्यासाठी तुम्ही घरच्या घरी आणि अगदी अनादी काळापासून चालत आलेल्या काही गोष्टींचा नक्कीच उपयोग करू शकता. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल म्हणजे नक्की कोणत्या गोष्टी? त्या आता या काळात मिळत असतील की नाही. तर जास्त विचार करू नका. तुमच्या त्वचेला तुकतुकीत ठेवण्याचं काम या पुरातन गोष्टीही चांगलं करतात. इतर रासायनिक उत्पादनं वापरण्यापेक्षा या वस्तूंचा उपयोग करून तुम्ही तुमचं सौंदर्य टिकवून ठेऊ शकता. आम्ही तुम्हाला याविषयी अधिक माहिती देणार आहोत.



**१. मुलतानी माती :** या सगळ्यावर एकमेव उपचार आहे. तो म्हणजे मुलतानी माती. तुमची त्वचा कोणत्या प्रकारची आहे याने काही फरक पडत नाही. मुलतानी मातीची जादू त्वचेवर कायम चालते. मुलतानी माती Fuller’s Earth या नावानेही ओळखली जाते. तुम्ही तुमच्या त्वचेला मुलतानी मातीचा एक पॅक लावल्यानंतर तुम्हाला एक fresh look तर मिळतोच याशिवाय तुमची त्वचा नैसर्गिकरित्या क्लिन होते. तसंच मुलातानी माती त्वचेवर exfoliator Afdn brightener चं देखील काम करते. यामध्ये अंतर्भूत असणारे Active elements तुमच्या त्वचेमधील धूळ, तेल आणि घाम यासारख्या गोष्टी शोषून घेतं. तसंच तुमची त्वचा अधिक तजेलदार, स्वच्छ, मुलायम आणि मऊ दिसण्यासाठीही याची मदत होते.

**२. हळदीत आहे काहीतरी खास :** लग्नाच्या रितीरिवाजांमध्ये उगीचच हळदीचा उपयोग केला जात नाही. आपल्या रितीभातींनाही काही कारणं आहेत. तुम्ही तुमच्या महत्त्वाच्या दिवशी अधिक उजळून दिसावं यासाठी हळदीचा उपयोग लग्नाच्या आधी केला जातो. हळद नेहमी तुमच्या सौंदर्यामध्ये भर घालते. हळद आपल्याला काही इजा तर पोहचवणार नाही ना अशी शंकाही मनाात येऊ देऊ नका. याचा वापर करण्यासाठी तुम्ही हवं तर बेसन अथवा दूध अथवा टॉमेटो प्युरीचा वापर करा. हळदीमुळे तुमच्या चेहऱ्यावरील पिंपल्स, dullness आणि सुरकुत्या हळूहळू कमी होतात. त्यामुळे हळदीचा वापर अनेक क्रिम्समध्येही करण्यात येतो.

**३. गुलाबपाण्याचा परिणाम :** तुमची त्वचा जर संवेदनशील असेल तर त्रासाचं काहीच कारण नाही. गुलाबपाणी तुमच्या त्वचेची खूपच चांगली काळजी घेतं. तसंच तुमच्या त्वचेला एजिंगसारख्या समस्येपासून दूर ठेवण्यासाठीही याचा उपयोग होतो. तुम्ही गुलाबपाण्याचा वापर तुमच्या त्वचेसाठी टोनर अथवा क्लिंन्झर म्हणूनही करू शकता.

**४. कोल्ड क्रिम अत्यंत कामाची गोष्ट :** तुम्ही कोल्ड क्रिम घरी तर तयार नाही करू शकत. पण एक साधं आणि परवडण्यायोग्य cold cream तुमच्या त्वचेवर नक्कीच उपयुक्त ठरतं. तुमच्या त्वचेला पोषण देण्यासाठी हा एक सोपा उपाय आहे. तुम्हाला केवळ हे क्रिम थंडीच्या दिवसातच लावायला हवं असं नाही. तर त्वचेला नेहमी hydrated ठेवण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता. तसंच रात्री गुलाबपाण्यासह मिक्स करून त्वचेसाठी तुम्ही याचा वापर करू शकता. यामुळे त्वचा तजेलदार राहण्यास मदत होते.

**५. अप्रतिम दही :** दही खाण्यात जितकी मजा आहे तितकाच दह्याचा उपयोग त्वचेसाठीही होतो. रोजच्या जेवणात जर तुम्ही एक वाटी दही खात असाल तर तुमच A complexion लाईट करण्यासाठी याची मदत होते. तसंच दही तुमच्या त्वचेवरील ॲक्ने कमी करण्यासाठीही उपयुक्त ठरतं. त्याचबरोबर दह्यामुळे dead cells आणि fine lines नष्ट होतात.

**६. सर्वात अप्रतिम उपाय मध :** आरोग्य आणि सौंदर्य दोन्हीसाठी उपयुक्त असणारी गोष्ट म्हणजे मध. हा एक अप्रतिम पर्याय आहे. मध ही एक super moisturizing property आहे जी तुमच्या त्वचेला मऊ आणि मुलायम बनवते. तसंच तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या येऊ देत नाही. यामुळे तुमच्या त्वचेमधील धूळ बाहेर निघून तुमची त्वचा मऊ आणि मुलायम होते. मध तुमच्या त्वचेला कायम तरूण राखण्यास मदत करते.

**७. बेसन :** तुम्हाला माहीत आहे का की, स्वयंपाकघरात असणारं बेसन हे तुमच्या त्वचेवर खूपच चांगला परिणाम देतं. याचा वापर तुम्ही दह्याबरोबर मिक्स करून पेस्ट करून स्क्रब म्हणून करू शकता. बेसन तुमच्या चेहऱ्यावर खूपच चांगली चमक आणतं. तसंच तुमच्या चेहऱ्यावरील unwanted hair काढून टाकण्यासाठीही याची मदत होते. तुम्हाला हवं तर तुम्ही याचा वापर हात आणि पायावरही करू शकता.

**८. तुळस आणि कडूलिंब :** या दोन्ही वनस्पतींचा उपयोग हा तुमच्या चेहऱ्यावरील पिंपल्स आणि काळे डाग काढून टाकण्यासाठी करता येतो. तुम्हाला जर ॲक्नेची समस्या असेल तर तुम्ही तुळस आणि कडूलिंबाचा वापर केलाच पाहिजे. तुम्ही दूध आणि गुलाबपाण्यासह याचा वापर करू शकता.

# रस्त्यांवरची गुन्हेगारी वाढली...

## चोरी, लुटमारीच्या घटना वाढल्या, पोलिसांकडूनही गुन्ह्यांचा वेगवान तपास




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईत २०२६ च्या पहिल्या तिमाहीत रस्ते गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून चोरी, लुटमार आणि वाहन चोरीच्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. मुंबई पोलीस दलाने जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील गुन्ह्यांची आकडेवारी जाहीर केली आहे.

यानुसार मालमत्तेशी संबंधित गुन्हे वाढत आहे. मात्र, असे असूनही पोलिसांकडूनही गुन्ह्यांचा वेगवान तपास होत आहे. आकडेवारीनुसार, चोरीच्या घटना १,३९७ वरून १,६२१ वर पोहोचल्या आहेत. पोलिसांनी यातील ५२२ गुन्ह्यांची उकल केली आहे. वाहन चोरीच्या ५८० घटनांची नोंद झाली असून २८७ गुन्हे उघड झाले आहेत. लुटमारीच्या घटनांमध्येही वाढ झाली असून ९० पैकी ८८ गुन्हे पोलिसांनी उकलले आहेत. गेल्या वर्षी याच काळात ७४ लुटमारीच्या घटना घडल्या होत्या. दरोड्याच्या ६ घटनांची नोंद झाली असून सर्व ६ गुन्हे पोलिसांनी उघड केले आहेत.

**मालमत्तेशी संबंधित गुन्हे**

घरफोडीच्या घटना २३४ झाल्या असून गेल्या वर्षी हा आकडा २५७ होता. मालमत्तेशी संबंधित गुन्हे शहरात वाढत असले तरी सक्रिय पोलीस यंत्रणा आणि जलद तपासामुळे गुन्हेगारांना पकडण्यात यश आले आहे.

**सोनसाखळी, लुटमारीच्या घटना**

सोनसाखळी चोरीच्या घटना २१ वरून २५ वर गेल्या असून २३ गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला आहे. हिसकावून चोरी करण्याच्या घटनांमध्ये मात्र घट झाली असून त्या ५२ वरून ३८ वर आल्या आहेत. यातील ३४ गुन्हे उघड झाले आहेत. दरम्यान, मुंबई पोलिसांनी लुटमारीच्या गुन्ह्यांमध्ये ९८ टक्के आणि सोनसाखळी चोरीमध्ये ९२ टक्के तपासाचे प्रमाण राखले असून आपली कार्यक्षमता दाखवून दिली आहे. वेगवान तपास केला आहे.

## खून, अपहरण, चोरी आणि खंडणीच्या घटनांत मोठी वाढ

मुंबई : चेंबूर, गोवंडी, मानखुर्द, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड या पूर्व उपनगरांत अपहरण, चोरी, खंडणी आणि दरोड्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मुंबईच्या पूर्व उपनगरांमध्ये गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचे पोलीस दलाच्या ताज्या आकडेवारीवरून समोर आले आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. महेश पाटील यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या या विभागात १८ पोलीस ठाण्यांचा समावेश होतो.

मुंबईत २०२५ मध्ये नोंदवलेल्या एकूण १२६ खून प्रकरणांपैकी ३२ गुन्हे एकट्या पूर्व उपनगरांत घडले आहेत. २०२४ मधील ३३ च्या तुलनेत ही संख्या किंचित कमी असली, तरी मुंबईतील सर्व विभागांमध्ये ती सर्वाधिक आहे. खुनाच्या प्रयत्नांच्या घटनांमध्येही ही उपनगरे आघाडीवर असून, गेल्या वर्षी १३७ असलेले हे प्रमाण यंदा १२८ नोंदवले आहे. मालमत्तेशी संबंधित गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ झाली असून, चोरीची प्रकरणे १,३२९ वरून १,४६० पर्यंत पोहोचली आहेत. तसेच वाहन चोरीच्या घटना ४४५ वरून ४५४ झाल्या आहेत.

**अपहरणाच्या घटना वाढल्या**

गेल्या एका वर्षात अपहरणाच्या घटना ३४७ वरून ३९६ वर गेल्या आहेत. मुंबईतील एकूण १,४२३ अपहरण प्रकरणांमध्ये पूर्व उपनगरांचा वाटा मोठा आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर असून अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना १६५ वरून १७६, तर प्रौढ महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे ९८ वरून १०१ झाली आहेत. विनयभंगाच्या घटना ५३१ वरून ५२८ कमी झाल्या आहेत.

**संघटित गुन्हे वाढले**

संघटित आणि हिंसक गुन्ह्यांमध्येही वाढ झाली असून दरोड्याच्या घटना जवळपास दुप्पट झाल्या आहेत. २०२४ मध्ये दरोड्याचे ७ गुन्हे नोंद झाले होते, तर २०२५ मध्ये ही संख्या १२ वर पोहोचली आहे. खंडणीच्या प्रकरणांत ५६ वरून ७४ पर्यंत वाढ झाली असून यामुळे या भागात संघटित गुन्हेगारीचे जाळे विस्तारत असल्याचे दिसून येत आहे. काही गुन्ह्यांमध्ये दिलासा मिळाला असून जबरी चोरीच्या घटना १२९ वरून ११४ वर, तर घरफोडीची प्रकरणे २५६ वरून २१४ वर आली आहेत. या वाढत्या गुन्हेगारीबाबत अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. महेश पाटील यांच्याकडे प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

**पूर्व उपनगरांतील गुन्हेगारी आकडेवारी**

- चोरी: १,४६० (२०२५), १,३२९ (२०२४)
- अपहरण: ३९६ (२०२५), ३४७ (२०२४)
- खंडणी: ७४ (२०२५), ५६ (२०२४)
- खून: ३२ (२०२५), ३३ (२०२४)
- अल्पवयीन मुलींवर अत्याचार: १७६ (२०२५), १६५ (२०२४)
- दरोडा: १२ (२०२५), ७ (२०२४)

# जबरदस्ती कलमा पठण करण्याच्या नावाखाली हल्ला

## हिंदू वॉचमन गंभीर जखमी... मीरारोडमधील धक्कादायक प्रकरण एटीएसकडे

**■मीरा रोड। प्रतिनिधी,**

मीरा रोडच्या नयानगर परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जबरदस्ती कलमा पठण करण्याच्या नावाखाली हिंदू वॉचमनला मारहाण करण्यात आली. यात वॉचमन गंभीर जखमी झाला आहे. घटनेनंतर नयानगर परिसरात तणाव निर्माण झाला. पोलीस ठाण्याबाहेर घोषणाबाजी करत आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

संजय नावाच्या (वय 30 ते 35 वर्षे) तरुणाने जबरदस्ती कलमा पठण करण्याच्या नावाखाली एका हिंदू वॉचमनवर हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात मिश्रा नावाचा वॉचमन गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर वॉकहार्ट रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच सुभ्रपसें नावाच्या दुसऱ्या व्यक्तीवरही हल्ला करण्यात आला असून त्याला सहा टाके घालावे लागले आहेत.

या घटनेची गंभीरता लक्षात घेता प्रकरण नयानगर पोलीस ठाण्याकडून राज्य एटीएसकडे सोपवण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाला अत्यंत संवेदनशील आणि गंभीर गुन्हा म्हणून पाहिले




जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर नयानगर परिसरात पुन्हा एकदा हिंदू-मुस्लिम तणाव वाढल्याचे चित्र आहे. याच परिसरात २२ जानेवारी रोजी ह्यजय श्रीरामह्व घोषणा दिल्याच्या कारणावरून काही हिंदूंवर हल्ला झाल्याची घटना घडली होती, ज्यामुळे परिसरातील वातावरण आधीच तणावपूर्ण होते. आता पुन्हा या हल्ल्याच्या घटनेमुळे राजकीय वातावरणही तापले आहे. स्थानिक राजकीय नेते मुजफ्फर हुसेन यांच्या भागात घडलेल्या या घटनेनंतर विविध संघटनांनी संताप व्यक्त केला आहे. काही संघटनांनी नयानगर पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन करत ह्यजय श्रीरामह्वच्या घोषणा दिल्या असून आरोपीवर कठोर कारवाई, अगदी एन्काउंटरची मागणीही केली जात आहे.

आरोपी संजयबाबत प्राथमिक माहिती अशी समोर आली आहे की, तो 2001 साली अमेरिकेत गेला होता आणि 2019 मध्ये भारतात परतला. त्याचे आई-वडील आणि पत्नी अमेरिकेचे नागरिक असल्याचे सांगितले जात आहे. तसेच तो मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्यामुळे कुटुंबीयांनी त्याला भारतात सोडल्याची माहितीही पुढे येत आहे. सध्या तो एका खासगी क्लासमध्ये शिक्षक म्हणून काम करत असल्याचेही समजते. सध्या पोलीस आणि अळर या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत असून परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

### मीरा रोडच्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरला गंडा

भाईंदर : इंस्टाग्राम आयडी देखभाईचे मालक आणि सोशल मीडिया मार्केटिंग व्यावसायिक शांतनू यादव (३५) यांची सायबर फसवणूक करून त्यांच्याकडून ५० हजार रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मिरारोड पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिरारोड येथील बेवर्ली पार्क परिसरात राहणाया शांतनू यादव यांची देख भाई नावाने इंस्टाग्रामवर ओळख आहे. पोलीस तक्रारीनुसार, ११ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत काही अज्ञात इसमांनी कट रचून वेगवेगळे बनावट ईमेल आयडी तयार केले. या टोळीने फियार्दी यांच्या पेजवरील ओरिजिनल व्हिडिओ आणि कंटेंटचे मालक आपणच आहोत, अशी खोटी माहिती इंस्टाग्राम व मेटा कंपनीला दिली. खोट्या माहितीच्या आधारे आरोपींनी यादव यांच्या पेजवर कॉपीराईट स्ट्राईक आणले, ज्यामुळे त्यांचे अनेक व्हिडिओ प्लॅटफॉर्मवरून काढून टाकण्यात आले. हे स्ट्राईक हटवण्यासाठी आरोपींनी यादव यांच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास आयडीवर आणखी स्ट्राईक वाढवून त्यांचे खाते कायमचे बंद करण्याची धमकी देण्यात आली. आपल्या व्यवसायाचे आणि पेजचे नुकसान टाळण्यासाठी फियार्दीने आरोपींना ५० हजार रुपये दिले. मात्र, फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मिरारोड पोलिसांनी २४ एप्रिल रोजी सायंकाळी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघना बुरांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.

# बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ल्याने खरंच मृत्यू होतो का?

## ‘त्या’ संपूर्ण कुटुंबाचा नेमका कसा झाला अंत?

### तपासानंतरच चित्र होईल स्पष्ट

संसर्ग विशेषज्ञ डॉ. ईश्वर गिलडा यांच्या मते, अशा घटनेचे खरे कारण निश्चित करणे सोपे नसते. ते म्हणाले की, जर अनेक लोकांनी एकच अन्न खाल्ले असेल आणि सर्वांना त्याचा संसर्ग झाला नसेल, तर पीडितांनी स्वतंत्रपणे काय खाल्ले होते किंवा यामागे दुसरे काही कारण होते का, हे तपासणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, सडलेल्या अन्नामुळे जिवाणू संसर्ग होऊ शकतो, परंतु काही प्रकरणांमध्ये रासायनिक किंवा विषारी पदार्थांच्या दूषिततेसारख्या बाह्य घटकांना नाकारता येत नाही. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शवविच्छेदन आणि न्यायवैद्यक तपासणीनंतरच मृत्यूचे खरे कारण उघड होईल. डॉक्टरांनी स्पष्ट केले की, कधीकधी कलिंगडांचा रंग उजळण्यासाठी त्यात एक रसायन टाकले जाते. जर ते रसायन दूषित असेल किंवा कोणीतरी घातपात करून त्यात विषारी द्रव्य मिसळले असेल, तर कलिंगड खाणाऱ्यांना विषबाधा होऊ शकते. तथापि, त्या चार जणांच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदनानंतरच पूर्णपणे स्पष्ट होईल.



**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मुंबईतील एका दुःखद घटनेने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. बियार्णी खाल्ल्यानंतर एकाच कुटुंबातील चार सदस्य अचानक आजारी पडले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. असे वृत्त आहे की, कुटुंबातील सदस्यांनी बियार्णीनंतर कलिंगड खाल्ला होता, त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण या घटनेनंतर सर्वात मोठा प्रश्न हा निर्माण झाला आहे की, बियार्णीनंतर कलिंगड खाणे जीवघेणे ठरू शकते का. पण, यावर अनेक डॉक्टर आपली मते मांडत आहेत. तर, आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की बियार्णीनंतर कलिंगड खाणे जीवघेणे आहे की नाही याबद्दल डॉक्टर काय म्हणतात.

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, बियार्णी आणि कलिंगड एकत्र किंवा थोड्या अंतराने खाल्ल्याने तात्काळ मृत्यू होण्याची शक्यता कमी आहे. डॉ. ईश्वर गिलडा म्हणतात की, हे वेगवेगळे पदार्थ आहेत आणि त्यांच्या पचनाचा कालावधी वेगवेगळा असतो. तथापि, यामुळे तात्काळ मृत्यू होणे असामान्य नाही. डॉक्टरांच्या मते, अशा प्रकरणांमध्ये अन्न विषबाधा हा प्राथमिक संशय असतो. जर अन्न किंवा फळ बराच वेळ उघड्यावर ठेवले असेल किंवा शिळे झाले असेल, तर त्यात धोकादायक जीवाणू असू शकतात. स्टॅफिलोकोकस, साल्मोनेला आणि ई. कोलाय सारखे जीवाणू अन्नातून शरीरात प्रवेश करू शकतात आणि उलट्या, जुलाब आणि गंभीर संसर्ग होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये, या स्थितीमुळे सेप्सिस होऊ शकतो, जो प्राणघातक ठरू शकतो.

**अन्न विषबाधेमुळे तात्काळ मृत्यू होऊ शकतो का ?**

डॉक्टर स्पष्ट करतात की, अन्न विषबाधेनंतर लक्षणे दिसण्यासाठी आणि स्थिती गंभीर होण्यासाठी सहसा काही वेळ लागतो. जर एखादी व्यक्ती पूर्वी निरोगी असेल, तर ती संसगार्शी लढण्याचा प्रयत्न करेल. तथापि, सततच्या उलट्या आणि जुलाबामुळे शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स कमी होऊ शकतात, ज्यामुळे रक्तदाब अचानक कमी होऊ शकतो आणि शॉक येऊ शकतो. ही परिस्थिती काही प्रकरणांमध्ये धोकादायक ठरू शकते.

**अन्नपदार्थांच्या संयोजनाबद्दल तज्ज्ञ काय म्हणतात ?**

काही तज्ज्ञांच्या मते, मांसाहारी आणि पाण्याने समृद्ध फळांच्या पचनाचा कालावधी वेगवेगळा असतो. कलिंगड लवकर पचते, तर मांस पचायला जास्त वेळ लागतो. त्यामुळे, दोन्ही एकत्र खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवू शकतात, परंतु याचा थेट संबंध मृत्यूशी जोडता येत नाही.

# महापौर-उपमहापौरांकडून पालिका क्षेत्रातील रस्ते व विकासकामांची पाहणी

**■नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित आणि सुरू असलेल्या विकासकामांचा दर्जा व वेग तपासण्यासाठी आज महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे यांनी नगरसेवकांसह पाहणी केली. यावेळी रस्ते, पूल आणि अन्य नागरी सुविधांच्या कामांचा आढावा घेण्यात आला.



आज सकाळी महापौर-उपमहापौरांनी आनंदवल्ली, कवडे गार्डन, जेहान सर्कल, बालाजी मंदिर, अंबिका स्वीट ते अमृत गार्डन तसेच पिंपळगाव बहुला परिसरातील विकासकामांची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे यांनी पाहणी केली.

या दौऱ्यात रस्त्यांचे खडीकरण त्यासोबतच डांबरीकरण, पुलांचे बांधकाम, भूमिगत वायरिंगचे आणि गटारीचे काम यासह परिसरातील इतर पायाभूत सुविधांच्या सद्यस्थितीची पाहणी करण्यात आली.

पाहणी दौऱ्यादरम्यान अनेक ठिकाणी कामाचा वेग मंदावल्याचे दिसून आल्याने, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि कंत्राटदारांना कामाला गती देण्याच्या सूचना महापौर हिमगौरी आहेर-आडके यांनी केल्या. तसेच कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी महापौर आणि उपमहापौरांनी शहरात ठिकठिकाणी सुरु असलेली विकासकामे विहित मुदतीत पूर्ण व्हावीत, जेणेकरून नागरिकांना होणारा त्रास कमी होईल. तसेच कामाच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष द्यावे,ह्व अशा कडक सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# ट्रकच्या धडकेत पादचार्‍याचा मृत्यू



**■वसई। प्रतिनिधी,**

वसईत धुमाळनगर परिसरात भंगाराने भरलेल्या ट्रकखाली पादचार्‍याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी गोंधळ घालत प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. मिळालेल्या माहितीनुसार, बिंदर रामनारायण प्रजापती (वय ५५) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. शुक्रवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ते धुमाळ नगर परिसरात रस्त्याने पायी जात होते. त्याच वेळी भंगाराने भरलेला ट्रक वजन काट्याकडे जात होता. अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक प्रजापती यांच्या अंगावरून गेला. या अपघातात ट्रकचे चाक त्यांच्या दोन्ही पायांवरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले.संतप्त नागरिकांनी यावेळी पोलिसांशी शाब्दिक वाद घातल्याची माहिती समोर आली आहे. धुमाळ नगर येथील वजन काट्याजवळ नेहमीच मोठ्या वाहनांची गर्दी आणि वाहतूक कोंडी होत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. याआधीही येथे अपघात घडले असून प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# २३ लाखांचे अमली पदार्थ जप्त करत तिघांना अटक

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाने व नयानगर पोलिसांनी शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त केले आहेत. या कारवाईत एकूण २३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन आरोपींना गजाआड करण्यात आले आहे.

मिरारोड येथील वेस्टर्न हॉटेल जवळ टियारा हिल्स सोसायटीजवळ २४ एप्रिल रोजी मध्यरात्री १२:४५ च्या सुमारास पोलिसांनी सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यात अर्शद अली हुसेन अली नकवी( वय ३८ वर्ष रा. खार, मुंबई ) याच्याकडून ११ लाख ८० रुपयाचे




५९ ग्रॅम मॅफेड्रॉन जप्त करण्यात आले. तर त्याचा साथीदार हुसेन अली फिरोज अली बदामी, (वय ३१ वर्ष, रा. शांतीनगर, मिरारोड) याच्याकडे ८ लाख ३८ हजार रुपयांचे ४१.९ ग्रॅम मॅफेड्रॉन सापडले. या कारवाईत गुन्ह्यासाठी वापरलेली एक मोटारसायकल देखील जप्त करण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात काशिगाव पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्याच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक समीर शेख हे करत आहेत.

तर दुर्सया कारवाईत नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका वडापाव विक्रेत्याला अंमली पदार्थांची विक्री करताना रंगेहात पकडण्यात आले. २४ एप्रिल रोजी मध्यरात्री लोधा रोड येथे कारवाई करण्यात आली. फारुख युसुफ खान( वय ५० वर्ष, रा. नयानगर, मिरारोड) या आरोपीच्या अंगझडतीत व घराची झडती घेतली असता १२.४८० ग्रॅम ह्यगरदह्व (हेरॉईन) नावाचा अंमली पदार्थ सापडला. नयानगर पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक शैलेंद्र पाटील हे करत आहेत.

# एसीबीची मोठी कारवाई, जिल्हा परिषदेचे 3 अधिकारी लाच स्वीकारतांना जाळ्यात

**■नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमध्ये अउइ पथकाने मोठी कारवाई करत जिल्हा परिषदेच्या तीन अधिकाऱ्यांना लाच स्वीकारतांना रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. मोजमाप पुस्तिकेवर स्वाक्षरी करण्यासाठी कंत्राटदाराकडून ६ हजार रुपयांची लाच घेताना वर्ग १, २ आणि ३ अशा तिन्ही श्रेणीतील अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणात सतीश साहेबराव दराडे (४२, रा. मखमलाबाद), सागर सतीश रावले (३५, रा. मखमलाबाद) व रवींद्र रामनाथ गायकवाड (२९, रा. चांदशी) या तिघांना ताब्यात घेतले आहे. हे तिघेही जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या इगतपुरी उपविभागात कार्यरत असून, इगतपुरी तालुक्यातील पिंपळगाव मोर येथे ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून ठेकेदारीचा परवाना घेतला आहे. त्यांनी पिंपळगाव मोर ग्रामपंचायतीची दोन कामे नोव्हेंबर २०२५ मध्ये मुदतीत पूर्ण केली होती. या कामाचे अंदाजे ४ लाख ५० हजार रुपयांचे बिल काढण्यासाठी ह्यमोजमाप पुस्तिकेह्वर स्वाक्षरी होणे आवश्यक होते. यासंदर्भात त्यांनी संशयित स्थापत्य अभियांत्रिकी सहायक असलेले रावले यांची भेट घेत चर्चा केली. मात्र, बिलाच्या २ टक्के म्हणजेच १ हजार रुपये घेतल्याशिवाय संशयित सहायक अभियंता दराडे स्वाक्षरी करणार नाहीत, असे सांगितले अन त्यास दराडे यांनीही दुजोरा दिला.

दरम्यान, तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. यानंतर तक्रारीची शहानिशा करुन सोमवार (दि.२७) रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. तडजोडीनंतर ६ हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर इगतपुरी उपविभागाच्या कार्यालयात संशयितांनी हे पैसे टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यास सांगितले. यावेळी दराडे यांनी पैसे स्वीकारून ते कनिष्ठ सहायक असलेल्या संशयित गायकवाडकडे सोपवताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने तिघांनाही अटक केली.

विशेष म्हणजे अउइ च्या या कारवाईत एकाच वेळी तीन वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी सहभागी असल्याचे समोर आले आहे. यात लाचेची मागणी रावले याने केली, त्याला दराडे यांनी संमती दिली आणि पैसे गायकवाड याने सांभाळले. या तिघांविरुद्ध इगतपुरी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून, याचा तपास एसीबी करत आहे.

## बुधवार पेठेत कारवाई, कथित वेश्याव्यवसाय रॅकेटचा पर्दाफाश

# पुणे शहरात 14 बांगलादेशी नागरिकांसह 18 जण ताब्यात

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शहरातील बुधवार पेठ परिसरात कथित वेश्याव्यवसायावर पोलिसांनी छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. या रॅकेटच्या माध्यमातून संघटित रॅकेटचा पदार्फाश करत 14 बांगलादेशींसह इतर 18 जणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी ‘डिस्को’ आणि ‘मॅचबॉक्स’ या इमारतींवर छापेमारी करत कडक कारवाई केली आहे. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

**पुण्याच्या बुधवार पेठेत मोठी कारवाई**

पोलिसांच्या माहितीनुसार, मानवी तिस्करीद्वारे महिलांना आणून त्यांना वेश्याव्यवसायात



ढकलल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या कारवाईदरम्यान दोन अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात आली आहे. अशातच पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणात पोलीस उपायुक्त कृषीकेश रावळ यांच्या माहितीनुसार, बुधवार पेठेत काही इमारतींमध्ये बेकायदेशीरपणे कागदपत्रांचा वापर करत असल्याचे आढळून आले.

**रॅकेटचे धागेदोरे कुठे ?**

या प्रकरणात यंत्रणांनी सखोल तपास करत बांगलादेशी नागरिकांनी भारतात प्रवेश कसा केला, बनावट कागदपत्र बनवण्यास कोणी मदत केली? याचा अनेक स्तरावरून तपास केला जाणार आहे. शिवाय, या रॅकेटचे धागेदोरे इतर राज्यांशी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी तस्करीचे जाळे विनले आहे का? या प्रश्नाचं उत्तर शोधलं जात आहे.

पोलिसांनी स्पष्ट केलं की, याचा दहशतवादी किंवा राष्ट्रविरोधी कारवायांशी थेट संबंध आहे का, याचा तपास सुरु आहे. बुधवार पेठ परिसरात अशा स्वरूपाच्या कारवाया करण्यात आल्या होत्या. मात्र, पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार उघडकीस आल्याने शहरात खळबळ माजली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com